SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा


तुमच्या बॉर्न बेबीची काळजी तुमच्याप्रमाणे आम्हालाही
नवजात बाळासाठी सर्व काही इथेच...
आता पुण्यात सुद्धा..
। स्वेटर । जॅकेट । झबले । टोपी । लंगोट । गादी ।
। मच्छरदाणी । बंडी । कॅप । टॉवेल । कपाट ।
। प्लास्टीक ड्रायशिट । सॉक्स । हातमोजे व बरेच काही.
जरीवाला
कापड बाजार, नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०३.०८.२०२६ | अंक नं. १०६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

92.5% शुद्ध चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंग | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
92.50 शुद्ध चांदीपासुन बनविलेले खास आपल्या लाडक्या लहान बालगोपाळांसाठी
चांदीमधील कार्टुन ग्लास, कडली, फुलपात्र, चमचा, ताट, वाटी, बाटली, कडे, पैंजण, वाळे, तोडे, मग आणि बरचं काही..

# शहरासह उपनगरी भागात नळाला येत आहे ‘अळ्यायुक्त गटारीचे पाणी’


उपनगरातील प्रेमदान चौक परिसरामध्ये महापालिकेच्या पिण्याच्या पाण्याच्या नळातून अळ्या आढळून आल्याच्या छायाचित्र दिसत आहे. (छाया - धनेश कटारिया)

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात, महानगरपालिकेने उपाययोजना करण्याची मागणी

नगर – शहरातील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी पुरवण्याची महापालिकेची जबाबदारी आहे. मात्र उपनगर भागात नागरिकांना महापालिकेच्या नळातून गटारीचे दुर्गंधीयुक्त घाण पाणी येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या उद्भवल्यास त्याची जबाबदारी महापालिका प्रशासन घेणार का असा सवाल नागरिक उपस्थित करत आहे.

उपनगरातील प्रेमदान चौक परिसरामध्ये पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन मधून गटारीचे दूषित पाणी तसेच त्यात आळ्या आढळून आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना गॅस्ट्रो कावीळ टायफाईड तसेच पोटाच्या विविध आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे.

याबाबत महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने तातडीने लक्ष घालून उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करावा, अशी मागणी परिसरातील रहिवासी यांनी केली आहे.

# टेम्पोत ठेवलेली २ लाखांची रोकड चालकाने केली लंपास

नगर – नगर शहरात मालकाच्या टेम्पोतून दोन लाख रुपयांहून अधिकची रोख रक्कम चालकानेच चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पुणे येथील एका संशयित चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत राजेश अमृतलाल चंगेडीया (वय ६०, रा.माणिकनगर,अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी अमोल दिलीप सुरवसे (रा. मथुरा निवास, तलाठी ऑफिस जवळ, वडगाव खुर्द, पुणे) हा तक्रारदार चंगेडीया यांच्याकडे चालक म्हणून काम करत होता. ३० जुलै रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास माणिकनगर येथील बंगल्याच्या पाठीमागे उभ्या असलेल्या टेम्पोमधून (क्र.एमएच १६बी३१०८) आरोपी अमोल सुरवसे याने ५०० रुपयांच्या ४१२ नोटा, म्हणजेच एकूण २ लाख ६ हजार ७०० रुपयांची रोकड पळवून नेली. ही रक्कम टेम्पोत एका पिशवीत ठेवली होती.

या प्रकरणी २ ऑगस्ट रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा नोंदवला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी भेट दिली. कोतवाली पोलिसांचे पथक आता संशयित आरोपीचा शोध घेत असून पुढील तपास पोलीस कर्मचारी सोमनाथ केकाण करत आहेत.

# नगर तालुक्यात भरदिवसा सुरु असलेल्या महिलांच्या लुटमारीच्या घटना थांबता थांबेनात

## शेतात काम करणाऱ्या आणखी एका महिलेला दोघांनी मारहाण करत लुटले; चोरट्यांच्या शोधाचे पोलिसांसमोर आव्हान

नगर – नगर तालुक्यातील खडकी, सारोळा कासार, घोसपुरी परिसरात गेल्या ४-५ दिवसांपासून भरदिवसा महिलांना मारहाण करत लुटण्याच्या घटना सुरु असून सारोळा शिवारात २ आणि खडकी शिवारात २ लुटमारीच्या घटना घडल्या नंतर घोसपुरी शिवारातही एका महिलेला लुटल्याची घटना १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास घडली आहे.

याबाबत सुमन पोपट झरेकर (वय ५८, रा. घोसपुरी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. घोसपुरी ते चिखली रस्त्यालगतच्या पडिक शेतात मोटरसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात भामट्यांनी सुमन झरेकर यांना गाठून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून पोबारा केला. सुमन झरेकर या शेतात असताना दोन अनोळखी इसम अचानक त्या ठिकाणी आले. काही समजण्याच्या आतच त्यांनी सुमन यांच्या गळ्यातील आणि कानातील ३२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने बळजबरीने ओढून घेतले. लुटमार केल्यानंतर दोन्ही आरोपी मोटरसायकलवरून वेगाने पसार झाले.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार गुंजाळ या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. या परिसरात गेल्या ४-५ दिवसांत महिलांना लुटण्याची ही पाचवी घटना असून परिसरातील महिलांमध्ये सध्या प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अज्ञात लुटारूंचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी परिसरात नाकाबंदी केली असून लवकरच आरोपींना अटक केली जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# सावेडीत घर फोडून सोन्याच्या दागिन्यांसह रोख रकमेची चोरी

## साडेतीन लाखांचा ऐवज लंपास; अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – सावेडीतील मॉडेल कॉलनी परिसरात एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कमेसह एकूण ३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मीरा भीमराज पटारे (वय ८१, रा.मॉडेल कॉलनी, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या ३१ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान घर बंद करून बाहेर गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. चोरट्याने घरातील सोन्याचे लॉकेट, गंठण, अंगठ्या, कानातील टॉप्स, चांदीची भांडी, तांब्या, पायातील पैंजण आणि रोख १५,५०० रुपये असा मिळून साडेतीन लाख रुपयांचा मुद्देमाल लांबवला.

२ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास चोरीचा हा प्रकार उघडकीस आला. यानंतर मीरा पटारे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (अ) नुसार अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवला आहे.

घटनास्थळाची पाहणी पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर करत आहेत. चोरीतील आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

नगर रोलिंग शटर
*नवीन शटर योग्य दरात मिळेल.
*जुने शटर रिपेरिंग व ग्रिसिंग केले जाईल
पत्ता- नगर अमरधाम जवळ, (लोंढे मळा) नालेगाव, अहिल्यानगर
रमेश ढवळे
7350682390

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे | महिलांसाठी पादत्राणे | मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स, स्नीकर्स, केंज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका! ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चप्पल
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE शू पॅलेस
सारडागल्ली,अ.नगर, मो : 9881531536

Become a COMPUTER PROFESSIONAL
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
PROGRAMMING - SOFTWARE DEVELOPMENT - DATA ANALYST & DATA SCIENCE - FULL STACK DEVELOPMENT
DIPLOMA COURSES - 2D & 3D ANIMATION - ADVANCE ACCOUNTING - CAD TRAINING PROGRAM
Enroll Now
www.dishagroup.in
दिल्ली गेट शाखा
9371051769
जुने बस स्टँड शाखा
9371151769
पाईपलाईन शाखा
7447761769

राखी पौर्णिमेनिमित्त खास ऑफर
शनिवार दि.२५ जुलैपासून स्टॉक असेपर्यंत ऑफर लागू
१ ते ८ वर्षांपर्यंतच्या मुलांचे बाबासूट फक्त ₹ 500/-
मुलींचे १ ते १६ वर्षांपर्यंत पार्टी वेअर भारी क्वॉलिटीचे ड्रेस फक्त ₹ 600/-
लहान मुलांचे ६०० रुपयांपर्यंतचे जीन्स फक्त रु.२००/-
वेळ : दु.१२ ते सायं.७ पर्यंत.. मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
9028201188

DCM SHRIRAM Growing with trust
Fenesta Better by Design
भारताची नंबर 1 खिडक्यांचा आणि दरवाजांचा ब्रँड
uPVC | Aluminium | Doors | Façades
आता अहिल्यानगर (अहमदनगर) मध्ये आहे.
CHANDAN GLASS
Plot No.23, Industrial Estate, Kedgaon, Ahilyanagar-414005, Maharashtra.
Ph: 9860119223,9823189592

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# भरदिवसा घरातून सोन्याचे दागिने आणि रोकडची चोरी

**अरणगाव रोड वरील घटना, संशयित महिलेविरुद्ध गुन्हा दाखल**

नगर – विद्यानगर अरणगाव रोड येथे भरदुपारी बंद घराच्या बेडरूममधील कपाटात ठेवलेले ५ लाख १२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोकड चोरून नेण्यात आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात संशयित महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रिती बबन बोठे (वय ३८, रा. विद्यानगर, अरणगाव रोड, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या २९ जुलै रोजी दुपारी १२ ते ३.३० या वेळेत कामानिमित्त घराबाहेर गेल्या होत्या. या दरम्यान संधी साधून संशयित महिला स्नेहल ज्ञानदेव बंदे (वय २५, मूळ रा. बाभळेश्वर, ता. राहाता, हल्ली रा. बागरोजा हडको, अहिल्यानगर) हिने घरात प्रवेश केला. कपाटाचा दरवाजा उघडून ५ तोळे सोन्याचे मिनी गंठन, २.५ तोळे वजनाचे मंगळसूत्र, ३ तोळे वजनाच्या ३ अंगठ्या, कर्णफुले व इतर दागिन्यांसह १ लाख रुपयांची रोकड असा एकूण ५ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल तिने चोरून नेला.

तक्रारदाराच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे या घटनेचा पुढील सखोल तपास करत आहेत.

# पेपरफुटी, एमपीएससी घोटाळा, टीईटी रद्द करण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाधिकारी कार्यालयसमोर 'जागरण गोंधळ घालत ठिय्या आंदोलन'

नगर – पेपरफुटी प्रकरणाने संपूर्ण भारतात वातावर तापलेले असताना महाराष्ट्रात मार्च २०२६ मध्ये झालेल्या औषधं निरीक्षक या पदासाठी एमपीएससीने परीक्षा घेतली असून या परीक्षेचा पेपर–फुटला असल्याची चर्चा समाज माध्यमात सुरू असून या परीक्षेचे काही प्रश्न बाहेर आले आहेत व त्याचे स्क्रीन शॉट समाज माध्यमात व्हायरल झाले आहेत. ही गंभीर घटना असून या प्रकरणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून मुळापासून तपास करून दोषींना कडक शासन करण्याची मागणी संभाजी ब्रिगेड निवेदनात केली आहे.



पेपर फुटी, एमपीएससी घोटाळा, टीईटी रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करताना संभाजी ब्रिगेडचे जिल्हा अध्यक्ष राजेश परकाळे व पदाधिकारी.

एमएचटी सीईटी परीक्षा ही ऑनलाईन स्वरूपात घेतली जाते व या वर एमएचटी सेलचे नियंत्रण असले तरी परीक्षा नाव नोंदणी करणे, परीक्षा केंद्र निश्चित करणे, परीक्षा हॉल तिकीट वितरित करणे, परीक्षा घेणे व निकाल तयार करून तो एमएचटी सेल कडे सुपूर्द करण्याचे महत्वपूर्ण काम खाजगी आस्थापना अर्थात खाजगी कंपनी कडे दिलेले आहे ही बाब अत्यंत गंभीर असून येथे हवे परीक्षा केंद्र देणे, मार्क वाढणे, परीक्षेत फेरफार करणे, आर्थिक तडजोडी करून गोरगरीब व हुशार विद्यार्थ्यांवर अन्याय केला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे, तसेच या परीक्षेचा निकाल पर्सेंटेजऐवजी पर्सेंटाइलमध्ये जाहीर केला जातो हा निकाल खरा नसून ही विद्यार्थी व पालकांची फसवणूक आहे असे मत संभाजी ब्रिगेडने व्यक्त केले आहे.

महाराष्ट्र सरकारने टीईटी अनिवार्य करून हजारो शिक्षकांची पिळवणूक केली आहे. या शिक्षकांनी सेवेत येताना आवश्यक पात्रता पूर्ण केली असून यांच्या कडे शिक्षणं पूर्ण करून लाखो विद्यार्थी आज आयएएस, आयपीएस, इंजिनिअर, डॉक्टर, वकील झाले आहेत हे वास्तव असून गुणवत्ता वाढीच्या नावाखाली सरकार आडमुठी भूमिका घेत आहे हे तमाम शिक्षक वर्गास वेठीस धरतं आहे हे चुकीचं धोरणं अवलंबत आहे याला संभाजी ब्रिगेडने तीव्र विरोध दर्शवला आहे.

या आंदोलनात संभाजी ब्रिगेड प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी अण्णासाहेब सावंत यांनी यापुढे एकही परीक्षा ऑनलाईन घेऊ दिली जाणार नाही, प्रसंगी कोणत्याही स्तराला जाऊन आंदोलन करण्याची वेळ आली तर मागे हटणार नाही व विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ देणार नाही असा इशारा दिला. या आंदोलनाचे नेतृत्व संभाजी ब्रिगेडचे जिल्हा अध्यक्ष राजेश परकाळे यांनी केले.

या पुढे टीईटी परीक्षा कायमस्वरूपी रद्द केली नाही तर सरकारला जी भाषा समजते, त्या आंदोलनाचा वापर करून सरकारच डोक ठिकाणावर आणले जाईल, असा इशारा जिल्हा अध्यक्ष राजेश परकाळे यांनी दिला.

या आंदोलनात संभाजी ब्रिगेडचे इंजि. शाम जरे, दिलीप वाळुंज, सद्दाम शेख, विठ्ठल देठे, सचिन काकडे, महेश दानवे, प्रशांत कांबळे, योगेश बोरकर, शशी दरेकर, वैभव लालगे, अवि मेढे, संदीप मांढरे, दादा ठोंबरे, शशांक सुरवसे, अच्युत गाडे यांच्यासह विद्यार्थी समृद्धी सासवडे, तनुजा सायबर, ऋतुजा गुंड, प्रतीक्षा अमृते, अक्षदा गुंड, अशोक गुंड, बिभीषण सासवडे, अशोक फाटे, गणेश खुळे, सुजित हजारे, अजित हजारे, प्रतीक फिसके, दीपक सदाफुले, ओम जराडे, महेश कांबळे, जयदीप बनकर आदी उपस्थित होते.

# गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्या चौघांना मुद्देमालासह रंगेहाथ पकडले


गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्या चौघांना मुद्देमालासह रंगेहाथ पकडल्या नंतर त्यांच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

नगर – नगर शहरात गोवंशीय जनावरांची कत्तल करून अवैधपणे मांस विक्री करणाऱ्या एका टोळीवर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणी चार जणांना रंगेहाथ पकडून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला असून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ ऑगस्ट रोजी कोतवाली पोलीस स्टेशनचे गुन्हे पथकाचे अंमलदार हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, पोलीस निरीक्षक नितीन देशमुखांना गुप्त बातमीदारांमार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट येथे काही व्यक्ती गोवंशीय जनावरांचे मांस विक्री करत आहेत. या बातमीच्या आधारे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी तात्काळ गुन्हे शोध पथकातील अंमलदारांना कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पथकाने संबंधित ठिकाणी जाऊन पाहणी केली असता, चार इसम त्या ठिकाणी मांस विक्री करत असल्याचे निदर्शनास आले.

पोलिसांनी नावेद सादिक कुरेशी (वय ४०, रा. व्यापारी मोहल्ला, कुरेशी मशीद जवळ, झेंडीगेट, अहिल्यानगर), कैफ अब्दुल मजीद कुरेशी (वय २१, रा. व्यापारी मोहल्ला, कुरेशी मशीद जवळ, झेंडीगेट, अहिल्यानगर), फैजान रौफ कुरेशी (वय १९, रा. सदर बाजार, भिंगार) आणि मोहम्मद अफशान शाकिर कुरेशी (वय १८, रा. व्यापारी मोहल्ला, कुरेशी मशीद जवळ, झेंडीगेट, अहिल्यानगर) यांना पकडले.

तेथे झडती घेतली असता त्यांच्या ताब्यात एकूण ३२ हजार ४०० रुपये किमतीचे १५० किलो गोमांस तसेच वजनकाटा, सत्तुर, चाकु व इतर साहित्य मिळून आले. विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली.

या प्रकरणी कोतवाली पोलीस स्टेशन येथे सर्व आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नगर शहरातील सराईत गुन्हेगारांची टोळी एक वर्षाकरीता जिल्ह्यातून हद्दपार

नगर – अहिल्यानगर जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे आवश्यक असल्याने गंभीर स्वरुपाचे शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगांरावर वचक बसविण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी अहिल्यानगर शहरातील सराईत गुन्हेगारांची टोळी हद्दपार केले बाबतचे आदेश पारीत केलेला आहे.

नगर शहरातील कोतवाली पोलीस स्टेशन, तोफखाना पोलीस स्टेशन व भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीत गैर कायदयाची मंडळी जमवुन घातक शस्त्रासह खुनाचा प्रयत्न करणे, अनुसुचित जाती जमातीच्या व्यक्तीला जाती वाचक शिवीगाळ करुन गंभीर दुखापत करणे, दरोडा टाकणे, अल्पवयीन मुलीस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे, हद्दपार आदेशाचा भंग करणे, दोन समाजात तेढ निर्माण होवुन व्देष पसरेल असे वर्तन करणे, जबर दुखापत घडुन येईल याची जाणीव असतांना दडपशाहीने बलात्कार करणाऱ्या टोळी विरुध्द कोतवालीचे पोलीस निरीक्षक यांनी प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी नमुद टोळीतील टोळी प्रमुख सरवर अस्लम शेख उर्फ भिम्या (रा.झेंडीगेट, सुभेदार गल्ली, अहिल्यानगर), टोळी सदस्य रेहान रऊफ शेख (वय २८, रा. नालसाब चौक, सुभेदार गल्ली, झेंडीगेट, अहिल्यानगर), मुजम्मील शहीद शेख (वय २६, रा. जिलाणी बिल्डींग, अहिल्यानगर) यांना १ वर्षाकरीता अहिल्यानगर जिल्हयातुन हद्दपार करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हयात संघटीतपणे गुन्हे करणाऱ्या टोळीचा बिमोड करण्यासाठी जिल्हयातील शरीराविरुध्द, मालाविरुध्द, गोवंशीय कायदयान्वये, भारतीय हत्यार कायदयान्वये तसेच वाळु चोरीचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगार इसमांची टोळीची माहिती संकलीत करुन त्यांचे विरुध्द हद्दपारीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच आणखी गुन्हेगारांचे टोळीची माहिती संकलीक करण्याचे काम सुरु असुन त्यांचे विरुध्दही हद्दपारीची कार्यवाही करणार असल्याचे पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सांगितले.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून जीवे मारण्याची धमकी


**दोघा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल**

नगर – भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी रुद्र ओमराज नायडू आणि जॉय सुरेश शिंदे (दोघे रा. कोंबडीवाला मळा, सोलापूर रोड, दरेवाडी शिवार, ता. जि. अहिल्यानगर) या दोन आरोपींविरुद्ध कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दरेवाडी शिवार परिसरातील राहत्या घरी दुपारी कोणी नसताना आरोपींनी एका अल्पवयीन मुलीला वेळोवेळी धमकावून तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. यामुळे ती मुलगी गरोदर राहिल्याचे समोर आले आहे. ही बाब कोणाला सांगितल्यास जिवे मारण्याची धमकीही आरोपींनी दिली होती.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड यांनी तात्काळ भेट देऊन पाहणी केली. मुलीला वैद्यकीय तपासासाठी अहिल्यानगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड पुढील तपास करत आहेत.

## शाम पानमळकर यांचे दु:खद निधन



नगर – नागरदेवळे येथील शाम शंकर पानमळकर (वय ५८) यांचे १ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गावठाण नागरदेवळे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, १ मुलगा, आई, वडील, भाऊ, भावजय, पुतणे, पुतण्या, बहीण, मेहुणे असा परिवार आहे. ते नागरदेवळे गावचे सरपंच राम पानमळकर यांचे मोठे बंधू होत.


## अशोकराव गायकवाड यांचे अल्प आजाराने निधन



नगर – आंबेडकरी चळवळीचे झुंजार नेते, आधारवड ज्येष्ठ नेते अशोकराव रामचंद्र गायकवाड (वय ७२) यांचे २ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ३ ऑगस्ट रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## द्रौपदीबाई काळे यांचे दु:खद निधन



नगर – देहरे (ता. अहिल्यानगर) येथील द्रौपदीबाई रंगनाथ काळे (वय ६६) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले आहे.

त्यांच्या पश्चात पती, मुलगी, दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे. देहरे येथील किराणा व्यावसायिक संदीप व प्रदिप यांच्या त्या मातोश्री होतं.

# डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानाचा शुभारंभ; जनजागृतीमुळे डेंगू रुग्णसंख्येत लक्षणीय घट

नगर – महापालिका आणि आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने श्रमिकनगर येथे डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानाचा शुभारंभ महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर यांच्या हस्ते करण्यात आला. अभियानांतर्गत परिसरातील पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली तसेच नागरिकांमध्ये डेंगू प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यात आली.


डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानाच्या शुभारंभप्रसंगी दिपालीताई बारस्कर, नगरसेवक बाळासाहेब पवार, नगरसेवक मनोज दुल्लम, नगरसेवक करण कराळे, नगरसेविका रोशनी त्रिंबके, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, डॉ. धनंजय वारे आदी उपस्थित होते.

सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या, आरोग्य हीच माणसाची खरी संपत्ती आहे. धकाधकीच्या जीवनात अनेकजण स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि स्वच्छतेच्या सवयी अंगीकारल्यास अनेक आजारांपासून बचाव होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांकडे वळून शारीरिक तंदुरुस्ती राखावी, असे आवाहन त्यांनी केले.

डेंगू हा अत्यंत जीवघेणा आजार असून त्यावर उपचारापेक्षा प्रतिबंध अधिक महत्त्वाचा आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून आणि परिसरापासून स्वच्छतेची सुरुवात करून साचलेले पाणी तातडीने नष्ट करावे. एडिस डासांची उत्पत्ती होणार नाही, यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यावश्यक आहे. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून दोन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानामुळे शहरातील डेंगू रुग्णसंख्येत मोठी घट झाल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, नगरसेवक मनोज दुल्लम, नगरसेवक करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, नगरसेविका रोशनी त्रिंबके, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, डॉ. धनंजय वारे, डॉ. पद्मा कुलकर्णी, विद्या एकलदेवी, श्याम पंगा, रोशनी सूर्यवंशी, शशिकांत गोरे, सोनाली मेहत्रे, डॉ. वृषाली आरु, डॉ. आरती ढापसे आदी उपस्थित होते.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून दोन वर्षांपूर्वी डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियान सुरू करण्यात आले. पावसाळ्यात डेंगूचा प्रादुर्भाव वाढत असल्याने नागरिकांमध्ये जनजागृती, पाणीसाठ्यांची तपासणी, डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण आणि मोफत आरोग्य तपासणी यांसारख्या उपाययोजना सातत्याने राबविण्यात येत असल्याचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी सांगितले.

महापालिकेने ३० आरोग्य पथके तयार केली असून प्रत्येक शनिवारी शहरातील विविध भागांत घरोघरी जाऊन सुमारे आठ हजार नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे काम केले जात आहे. अभियानाच्या पहिल्या वर्षी शहरात ७८ डेंगू रुग्ण आढळले होते. दुसऱ्या वर्षी ही संख्या १८ वर आली, तर यावर्षी जुलैअखेरपर्यंत केवळ ३ रुग्ण आढळले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

यावेळी नगरसेवक करण कराळे, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, डॉ. धनंजय वारे, डॉ. पद्मा कुलकर्णी आणि रोशनी सूर्यवंशी यांनीही आरोग्याची काळजी, स्वच्छता आणि डेंगू प्रतिबंधक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

अभियानादरम्यान आशा सेविका तसेच डॉ. एन. जी. पाऊलबुद्धे फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून डेंगूविषयी प्रभावी जनजागृती केली. तसेच मार्कंडेय शाळेची विद्यार्थिनी समीक्षा मुद्द्याल हिने भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांच्या वेशभूषेत डेंगू प्रतिबंधाबाबत नागरिकांना संदेश दिला.

## आयुर्वेद कॉलेजमधून मोटारसायकलची चोरी

नगर – शहरातील आयुर्वेद कॉलेज येथील कॅन्टीन समोरून एक होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल (क्र.एम.एच. १६ बी.एन. ८५५८) चोरीला गेल्याची घटना १ऑगस्ट रोजी दुपारी २ ते २.३० वाजेच्या सुमारास घडली.

या प्रकरणी किसन नाथू होले (वय ६७, धंदा–शेती, रा. मराठी शाळेजवळ, नेप्ती, ता. नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पो.हे.कॉ. आडसरे या पुढील तपास करत आहेत.

# नगरमधील विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे काम पूर्णत्वास नेणार

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, चौथे शिवाजी महाराज स्मारकाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित राहणार**

नगर – राज्याच्या प्रथम महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार अचानक अहिल्यानगर येथे शासकीय विश्रामगृह येथे काही वेळासाठी थांबल्या होत्या. यावेळी स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटना आणि छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेत विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे उद्घाटनासाठी आपण यावे अशी विनंती करत उर्वरित उपक्रमासाठी निधी मिळावा असे निवेदन दिले.


उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन देताना स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटना आणि छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक समितीचे पदाधिकारी.

यावेळी त्यांच्याशी बोलताना यशवंत तोडमल म्हटले की दोन वर्षांपूर्वी स्मायलिंग अस्मिता आणि छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक समितीच्या वतीने राज्याच्या मुख्यमंत्र्यांना रक्ताने पत्र लिहून स्मारकाच्या कामासाठी निधी मागितला होता.त्याची दखल घेत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी ८० लाख रुपयांचा भरीव निधी मंजूर करून याकामी बळ दिले होते. तसेच या कामाच्या उद्घाटनप्रसंगी उर्वरित उपक्रमासाठी निधी देऊ असे आश्वासनही त्यांनी आम्हाला दिले होते. त्यांच्या अपघाती मृत्यूनंतर त्यांनी केलेल्या या मदतीबद्दल संघटनेने कृतज्ञता म्हणून विद्यार्थी सहाय्यता केंद्रात अजितदादांच्या नावाने कलादालन उभारण्याचे ठरवले आहे.

दरम्यान स्मारक समितीचे खजिनदार शुभम पांडूळे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी पुढील महिन्यात विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित रहावे अशी विनंती केली. यावर उपमुख्यमंत्री पवारांनी होकार भरत कायमस्वरूपी स्मारक समितीच्या पाठिशी आहोत म्हणत सुरू असलेल्या कामासाठी भरीव निधी देऊ असे आश्वासन दिले.

या भेटीदरम्यान शहराच्या महापौर ज्योती गाडे यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील चौथे शिवाजी महाराजांच्या इतिहासाची माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांना दिली. दोन्ही संस्थांच्या वतीने सुनेत्रा पवारांना चौथे शिवाजी महाराजांचे पुस्तक देत स्वागत केले गेले. १५ ऑगस्ट नंतर पावसाच्या अंदाजाने उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे अशी माहिती यशवंत तोडमल यांनी दिली.

यावेळी विनीत गाडे, धिरज कुमटकर,सागर कराळे अक्षय शेळके आणि सचिन गाडे उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### खा लोहयुक्त पदार्थ

लोहयुक्त पदार्थ म्हणजे शरीरासाठी ऊर्जा आणि रक्त वाढवणारे खजिना आहेत. प्राचीन काळापासून यांना 'शक्तीचा आधार' मानले जाते आणि आता आधुनिक आहारशास्त्रानेही यांना 'सुपरफूड' चा दर्जा दिला आहे. पालक, नाचणी, गूळ, डाळी, तिळ, मनुका आणि हिरव्या पालेभाज्या लोह, फॉलिक ॲसिड, प्रोटीन आणि फायबरने समृद्ध आहेत. यातील खास 'लोह' नावाचे खनिज रक्तातील हिमोग्लोबिन वाढवते, थकवा कमी करते आणि शरीराला ऊर्जा देते. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी लोहयुक्त पदार्थ रामबाण आहेत कारण एका वाटी नाचणी किंवा पालकाच्या भाजीतून दिवसभराची लोहाची गरज बऱ्याच प्रमाणात पूर्ण होते. रक्ताची कमतरता असणाऱ्यांसाठी हे पदार्थ उत्तम आहेत, कारण यात लोहाचे प्रमाण जास्त आणि शोषणासाठी मदत करणारे व्हिटॅमिन सी देखील असते. लोहामुळे हिमोग्लोबिन वाढते तर फॉलिक ॲसिड नवीन रक्तपेशी तयार करण्यास मदत करते. हिवाळ्यात शरीर गरम ठेवण्यासाठी, त्वचा कांतिमय करण्यासाठी आणि केस गळती थांबवण्यासाठीही लोहयुक्त पदार्थांचा उपयोग होतो. आयुर्वेदात गूळ आणि तिळाला रक्तवर्धक व शक्तीवर्धक पदार्थ मानले आहे. गोड-तिखट चवीमुळे ते लाडू, भाजी, थालीपीठ अशा अनेक प्रकारे खाल्ले जाते. महागड्या औषधांपेक्षा लोहयुक्त पदार्थ सहज, स्वस्त आणि आपल्या स्वयंपाकघरातले असल्याने अधिक गुणकारी ठरतात.

## पाककला

### चॉकलेट मोदक

**साहित्य :** डार्क चॉकलेट २०० ग्रॅम, मिल्क चॉकलेट १०० ग्रॅम, फ्रेश क्रीम १/४ कप, बटर १ चमचा, मावा १/२ कप, पिठी साखर २ चमचे, वेलची पावडर १/४ चमचा, काजूचे तुकडे २ चमचे, मोदकाचा साचा ६-७

**कृती :** एका भांड्यात डार्क चॉकलेट आणि मिल्क चॉकलेट बारीक तुकडे करून घ्या. त्यात फ्रेश क्रीम आणि बटर घालून डबल बॉयलरवर वितळवून घ्या. मिश्रण गुळगुळीत झाले की गॅस बंद करा आणि थंड होऊ द्या. दुसऱ्या कढईत मावा मंद आचेवर २ मिनिटे परतून घ्या. त्यात पिठी साखर, वेलची पावडर आणि काजूचे तुकडे घालून मिश्रण एकजीव करा. थंड झाल्यावर त्याचे लहान लहान गोळे बनवा. मोदकाच्या साच्याला आतून वितळवलेले चॉकलेट ब्रशने लावा. फ्रीजमध्ये १० मिनिटे सेट होऊ द्या. पुन्हा एकदा चॉकलेटचा थर लावा. मध्ये तयार माव्याचे मिश्रण ठेवा. वरून पुन्हा चॉकलेटने झाकून टाका. साचा फ्रीजमध्ये ३० मिनिटे सेट होण्यासाठी ठेवा. सेट झाल्यावर हलक्या हाताने मोदक बाहेर काढा. तयार चॉकलेट मोदक गार्निश करा.

## वास्तू

### झोपेसंबंधी टिप्स

* बेडरूममध्ये जड फर्निचर दक्षिण-पश्चिम दिशेला असावे. झोपताना डोक्यावर बीम किंवा जड फोटो नसावा. खोलीत काटेरी झाडे, वाळलेली फुले किंवा महाभारत, रडणाऱ्या व्यक्तीची चित्रे लावू नयेत.

* शांत निसर्गाची किंवा देवाची चित्रे लावा.

* मन शांत ठेवून झोपणे. झोपण्यापूर्वी भांडण, मोबाईलवरील निगेटिव्ह बातम्या किंवा जास्त विचार करणे टाळा.

* ५ मिनिटे श्वासावर लक्ष द्या किंवा देवाचे नाव घ्या. या छोट्या सवयी दररोज पाळल्यास एका महिन्यातच तुमच्या झोपेची गुणवत्ता, घरातील शांती आणि सकाळी उठल्यावरचा उत्साह नक्कीच वाढेल. कारण चांगली रात्र म्हणजेच चांगला उद्या.

## सौंदर्य

* २ चमचे नाचणीचे तेल गरम करून त्यात बारीक चिरलेला कांदा ५ मिनिटे तळून घ्या. थंड झाल्यावर गाळून घ्या. आठवड्यातून २ वेळा लावा. केस गळती थांबते आणि नवीन केस येतात.

* रेशमी किंवा साटिनच्या उशीवर झोपा. याने केस फ्रिझ होत नाहीत आणि चेहऱ्यावर झोपेच्या रेषा पडत नाहीत.

* आठवड्यातून एकदा ५ मिनिटे चेहऱ्याला वाफ द्या आणि लगेच थंड पाण्याने तोंड धुवा.

## सल्ला

तिसरा नियम म्हणजे कचरा. ओला कचरा रोज संध्याकाळी बाहेर टाका. त्यामुळे स्वयंपाकघरात मुंग्या, झुरळे आणि दुर्गंधी येत नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, रेवती २१।५४, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. १२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात नवीन संधी लाभेल. आरोग्य मध्यम राहिल.

**वृषभ :** कुटुंबासोबत चांगला दिवस जाईल. आर्थिक स्थिती सुधारेल.

**मिथुन :** बोलण्यातून काम होतील. विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस राहिल.

**कर्क :** मन अस्वस्थ राहील. नोकरीत वरिष्ठांचे सहकार्य मिळेल.

**सिंह :** आत्मविश्वास वाढेल. व्यवसायात प्रगती होईल. आरोग्य चांगले राहिल.

**कन्या :** कामाचा ताण जाणवेल. यश मिळेल. आर्थिक बाबतीत काळजी घ्याल.

**तूळ :** नात्यात गोडवा राहिल. जोडीदाराकडून भेटवस्तू मिळेल.

**वृश्चिक :** वाद-विवादाची शक्यता. धार्मिक कार्य होतील.

**धनु :** शिक्षण-करिअरमध्ये प्रगती होईल. मित्रांची मदत मिळेल.


**मकर :** कठीण काम पूर्ण होतील. कुटुंबाची जबाबदारी वाढेल.

**कुंभ :** सर्जनशील कामात यश मिळेल. ओळख वाढेल. अनावश्यक खर्च होईल.

**मीन :** आध्यात्मिक दिवस राहिल. आर्थिक लाभ होतील.

# शब्दगंध क्र. ७४८७

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) शंकराची पत्नी; पार्वती ३) अन्न न मिळण्यासारखी स्थिती ७) सारख्या स्वभावाचा ८) विष्णुपत्नी; लक्ष्मी ९) एकेक बाब घेऊन ११) वृष्टी; वर्षा; पर्जन्य १३) साल; वर्ष; शक १४) अंदाजाने; सरसकट; मध्यम; साधारणत १६) जळजळ १७) एक प्रवासी वाहन १९) मुदतीविषयीचा करार २१) एकरूप; तादात्म्य २२) व्यवस्था; मांडणी; ठेवण

**उभे शब्द :-** १) परत देण्याच्या बोलीने मागून आणलेले २) आईचा भाऊ; मातुल ३) विलंब; वेळ; अवकाश ४) पालनपोषण करणारा; एक पालेभाजी ५) गायनातील एक राग ६) बेतासबेत; जमा आणि खर्च यांची बरोबरी १०) मनसब धारण करणारा १२) गरम; उष्ण; सूर्याचे किरण अथवा तेज १४) एका ठिकाणी बसणेउठणे १५) एक केसाळ जंगली प्राणी; अस्वल १८) उष्णतेमुळे त्वचेतून बाहेर पडणारे पाणी; घर्मबिंदू २०) एक पक्षी

### शब्दगंध क्र. ७४८६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वा | सा | ■ | क | म | न | शि | बी |
| सु | धा | र | णा | ■ | व | ■ | ज |
| धा | र | ■ | द | वा | खा | ना | ■ |
| ■ | ण | ■ | ■ | क | ■ | म | ग |
| सं | ■ | चौ | क | स | ■ | दा | र |
| त | व | की | ल | ■ | ■ | र | ग |
| ■ | स | दा | ■ | वा | या | ■ | री |
| वा | न | र | ■ | फा | र | क | त |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** शब्द जपा, माणसं आपोआप जपली जातील.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### काही लोकांना डाव्या हाताने लिहायला जास्त सोपे का जाते?

मित्रांनो, कधी तुम्ही वर्गात लक्ष दिलं आहे का? काही मित्र पेन उजव्या हातात धरून लिहितात आणि काही मित्र पेन डाव्या हातात धरून लिहितात. शिक्षक जेव्हा फळ्यावर लिहितात तेव्हा बहुतेक शिक्षक उजव्या हाताने लिहितात, पण कधीतरी एखादा सर किंवा मॅडम डाव्या हाताने लिहिताना दिसतात. मग प्रश्न पडतो, असं का होतं? आपण ठरवून डावा किंवा उजवा हात निवडतो का? की त्यामागे काहीतरी मोठं कारण आहे? चला आज याचं गमतीशीर उत्तर जाणून घेऊया. सगळ्यात आधी आपल्याला आपल्या डोक्याबद्दल समजून घ्यावं लागेल. आपल्या डोक्यात मेंदू नावाचा एक सुपर कॉम्प्युटर आहे. हा कॉम्प्युटर दिवसभर काम करत असतो. आपण चालतो, बोलतो, खेळतो, विचार करतो, स्वप्न बघतो हे सगळं याच मेंदूमुळे होतं. आणि हा मेंदू दोन भागांमध्ये विभागलेला आहे. एक भाग म्हणजे उजवा मेंदू आणि दुसरा भाग म्हणजे डावा मेंदू. हे दोन्ही भाग एका जाड दोरीने एकमेकांशी जोडलेले असतात आणि ते दोघे मित्रांसारखे एकत्र काम करतात.आता सगळ्यात मोठी गंमत इथेच आहे. आपल्या मेंदूचा डावा भाग आपल्या शरीराच्या उजव्या बाजूला कंट्रोल करतो. आणि मेंदूचा उजवा भाग आपल्या शरीराच्या डाव्या बाजूला कंट्रोल करतो.

म्हणजे डोकं एकदम उलटं काम करतं. जसे रिमोट कंट्रोलने आपण टीव्ही चालवतो ना, तसंच मेंदू आपल्या हातापायांना सिग्नल पाठवतो.जगात १० पैकी ९ लोक उजव्या हाताने काम करतात. याला आपण उजवे म्हणतो. याचं कारण त्यांच्या मेंदूचा डावा भाग जास्त ॲक्टिव्ह असतो. डावा मेंदू भाषा, गणित, लॉजिक, बोलणं या गोष्टींमध्ये हुशार असतो. म्हणून शाळेत जेव्हा आपण अक्षरं लिहायला शिकतो, गणित करतो तेव्हा डावा मेंदू जास्त काम करतो. आणि तो सिग्नल उजव्या हाताला पाठवतो. म्हणून बहुतेक मुलांना उजव्या हाताने लिहायला नैसर्गिकरित्या सोपं वाटतं.पण मग काही मुलं डाव्या हाताने का लिहितात? याचं कारण त्यांचा उजवा मेंदू जास्त ॲक्टिव्ह असतो.

उजवा मेंदू हा क्रिएटिव्ह असतो. म्हणजे चित्र काढणं, संगीत ऐकणं, कथा बनवणं, स्वप्न बघणं, नवीन आयडिया शोधणं या सगळ्या गोष्टी उजवा मेंदू चांगल्या करतो. जेव्हा एखाद्या मुलाचा उजवा मेंदू डाव्या हाताला सिग्नल देतो की चल, तू पेन पकड आणि लिही, तेव्हा त्या मुलाला डाव्या हाताने लिहायला जास्त आरामदायक आणि सोपं वाटतं. अशा लोकांना आपण डावे म्हणतो. जगात फक्त १० पैकी १ व्यक्ती डावी असते. म्हणून डावे लोक थोडे खास आणि वेगळे असतात.डाव्या हाताने लिहिणाऱ्या मुलांमध्ये काही खास गुण दिसून येतात. ते अनेकदा चित्र खूप सुंदर काढतात, गाणी लवकर लक्षात ठेवतात, खेळात वेगळी युक्ती करतात.

जुन्या काळातले प्रसिद्ध शास्त्रज्ञ लिओनार्दो दा विंची, शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन, कलाकार मायकेल जॅक्सन, अभिनेते अमिताभ बच्चन हे सगळे डाव्या हाताने काम करायचे. खेळाडूंमध्ये देखील बरेच टेनिस आणि क्रिकेटचे खेळाडू डावे आहेत कारण त्यांना बॉल वेगळ्या अँगलने फेकता येतो आणि समोरच्या खेळाडूला गोंधळ होतो.आता एक महत्वाचा प्रश्न. लहानपणी आपण मुलाला जबरदस्तीने उजव्या हाताने लिहायला लावू शकतो का? नाही. कारण हे मेंदूने आधीच ठरवलेलं असतं.

जर एखाद्या डाव्या मुलाला जबरदस्तीने उजव्या हाताने लिहायला लावलं तर त्याला लिहायला त्रास होतो, अक्षरं वाकडी होतात आणि कधीकधी डोकं दुखायला लागतं. म्हणून आई-बाबा आणि शिक्षकांनी नेहमी मुलाला ज्या हाताने सोयीचं वाटतं त्याच हाताने लिहू द्यावं.आणखी एक गंमत सांगतो. आपल्या पोटात आपण जेव्हा बाळ असतो, तेव्हा ३ महिन्याचे असतानाच आपला मेंदू ठरवतो की आपण डावे होणार की उजवे. म्हणजे आपण जन्माला येण्यापूर्वीच हे ठरतं. आणि हे बदलता येत नाही.म्हणून लक्षात ठेवा, डावा हात असो की उजवा हात, दोन्ही आपलेच आहेत आणि दोन्ही सारखेच महत्वाचे आहेत. उजव्या हाताने लिहिणं वाईट नाही आणि डाव्या हाताने लिहिणं पण वाईट नाही. फक्त आपला मेंदू कोणाला जास्त पसंत करतो एवढाच फरक आहे. म्हणून जर तुमच्या वर्गात कोणी डाव्या हाताने लिहित असेल तर त्याला अरे तू वेगळा आहेस म्हणून चिडवू नका. उलट त्याला शाबासकी द्या. कारण कदाचित तो पुढे जाऊन मोठा चित्रकार, संगीतकार किंवा शास्त्रज्ञ बनेल.आता तुम्ही सांगा, तुम्ही कोणत्या हाताने लिहिता? उजव्या की डाव्या? आणि तुम्हाला डाव्या हाताने नाव लिहून बघायचं आहे का? एकदा ट्राय करून बघा.

### दोन सफरचंद आणि शहाणपण


एका गावात राजू आणि मोहन नावाचे दोन मित्र राहत होते. दोघेही शाळेत एकत्र जायचे, एकत्र खेळायचे. एके दिवशी शाळेतून येताना वाटेत त्यांना एका झाडाखाली दोन मोठी, लाल-लाल सफरचंद पडलेली दिसली. दोघांच्याही तोंडाला पाणी सुटले.

राजू लगेच म्हणाला, अरे बघ! सफरचंद! आपण वाटून खाऊया. पण मोहन म्हणाला, नाही, हे दोन्ही माझे. मी आधी पाहिले.दोघांमध्ये भांडण सुरू झाले. शेवटी त्यांनी ठरवले की गावातील आजोबांकडे जाऊन विचारू. आजोबा खूप शहाणे होते.आजोबांनी दोन्ही सफरचंद हातात घेतली. एक सफरचंद वरून खूप चकचकीत आणि मोठे दिसत होते. दुसरे सफरचंद थोडे छोटे आणि त्यावर एक डाग होता.

आजोबा म्हणाले, ठीक आहे. मी एक परीक्षा घेईन. जो जिंकेल त्याला दोन्ही सफरचंद मिळतील. त्यांनी पहिले ते मोठे चकचकीत सफरचंद राजूला दिले आणि छोटे डाग असलेले सफरचंद मोहनला दिले. राजू खूप खुश झाला. त्याने लगेच मोठा घास घेतला. पण आतून ते सफरचंद अर्धे कुजले होते. आत किडे होते. मोहनने त्याचे छोटे सफरचंद हळूवारपणे सोलले. वर डाग होता पण आतून ते पूर्ण गोड, रसाळ आणि ताजे होते.

आजोबा हसून म्हणाले, बघा मुलांनो. आयुष्य देखील असेच आहे. जे वरून खूप सुंदर आणि मोठे दिसते ते आतून रिकामे आणि वाईट असू शकते. आणि जे वरून साधे दिसते त्यात खरा गोडवा आणि शहाणपण असतो. राजू, तू फक्त बाह्य रूप बघून खुश झालास. मोहन, तू संयम ठेवला म्हणून तुला चांगले फळ मिळाले. आणि दोघांनो, भांडणामुळे मैत्री खराब करू नका. जे मिळेल ते वाटून खाल्ले तर आनंद दुप्पट होतो.ते ऐकून दोघांनाही लाज वाटली. त्या दिवशी त्यांनी ठरवले की यापुढे कधीही छोट्या गोष्टीसाठी भांडणार नाहीत आणि जे काही असेल ते वाटून घेतील.

बोध : वरवरच्या गोष्टींवर जाऊ नका जे चकचकीत दिसते तेच चांगले असते असे नाही. माणसाचा स्वभाव त्याच्या कृतीवरून ओळखा.



## आत्मशक्ति

### अभय

भयाच्या प्रति असंवेदनाक्षम बना! ज वैद्यकीय उपचार पध्दतीत जर एखाद्याला एखाद्या विशिष्ट पध्दतीची ॲलर्जी असेल तर त्याला भूल दिली जाते व त्याबद्दलची जाणीव मारली जाते. जेव्हा त्याला त्या पदार्थांची थोडी थोडी मात्रा दिली असतांना त्या छोट्या मात्रांनी त्याच्या शरीरात प्रतिकारक शक्ती तयार होते. मग त्याला त्या पदार्थाचा मोठा डोस दिला तरी त्याच्या पचनी पडतो. अशाच पध्दतीने आम्ही छोट्या-छोट्या प्रसंगात धैर्याचा अभ्यास करीत गेलो तर कठीण परिस्थितीलाही आम्ही तोंड देऊ शकू. मात्र धैर्याचा अभ्यास करण्यासाठी आम्हाला चैतन्यशक्ती, आत्म्याच्या संपर्कात रहावे लागेल.

तुम्हाला ज्या गोष्टींची भीति वाटते त्यांची यादी करा. त्या भीतीमागची कारणे शोधा. त्यांचे योग्य वर्गीकरण करा. कोणत्या भीती, कोणती शंका व असत्यपणा आहे ह्याचा शोध घ्या. तर कोणती भीति अज्ञातापासून आहे हे शोधा!

असे केल्यावर ज्यापासून कमी भीति वाटते अशा गोष्टी निवडा व भीति काढून टाकण्यास सुरुवात करा.सर्वात कमी भीति वाटते तेथून सुरुवात करा. खालीलप्रमाणे सुचविलेला अभ्यास उपयोगी पडेल.

ध्यानाला बसा, मनावरचा ताण दूर करा! आपण एकटे नाहीत व भीतीशी झगडु शकतो हे लक्षात घ्या. आपण परमात्म्याचाच एक अंश आहोत, चैतन्यशील आत्मा आहोत. आत्मा आणि परमात्मा यांना भीति नसते, ते पूर्णतया निर्भय असतात. आपण पूर्ण आत्मा आहोत अशा दृष्टीने स्वतः कडे बघा म्हणजे भीति वाटणार नाही. आपल्या दुःखाचे विश्लेषण करा, बघा! कोणत्या गोष्टीपासून भीति वाटते ते! ठामपणाने लक्षांत घ्या की ही भीति तुमचे काहीही बिघडवू शकणार नाही कारण आपण चैतन्यशक्ती आत्मा आहोत व परमेश्वराशी एकमेक (एकरूप) आहोत. आपल्याला त्रास देणाऱ्या भितीपेक्षा आपण जास्त शक्तीशाली आहोत. तेव्हा आपल्या चैतन्यशील

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### पुनर्जन्म

शिवानीदीदी :

अगदी खरंय. याचं कारण, ते मूल म्हणजे एक आत्मा आहे ज्याने एक शरीररूपी पोशाख सोडून दुसरा पोशाख घातला आहे. त्या आत्म्याने मागच्या जन्मात, जेव्हा तो एका दुसऱ्या कुटुंबाचा भाग होता, तेव्हा काही कार्मिक खाती आणि संस्कार तयार केले आहेत, जे तो त्याच्या बरोबर घेऊन आला आहे. जसा, वर्षअखेरीचा 'क्लोजिंग बॅलन्स' पुढच्या वर्षीच्या पहिल्या दिवसाचा 'ओपनिंग 'बॅलन्स' असतो तसंच हे आहे. तान्ह्या मुलाची पाटी कोरी कधीच नसते, तिच्यावर आधीपासूनच खूप काही नोंदवलेलं असतं. त्या आत्म्याचा मागच्या जन्मातल्या शरीराचा क्लोजिंग बॅलन्स त्याच्या ह्या नवीन शरीराचा ओपनिंग बॅलन्स आहे.

आपण सगळ्यांनीच हे लक्षात ठेवलं पाहिजे कारण आपण अनेकदा आपल्या कृतींमुळे होणाऱ्या परिणामांचा गांभीर्याने विचार करत नाही. आपल्या प्रत्येक कर्माचा आपल्या आत्म्यावर खोलवर परिणाम होतो.

जेव्हा आपण एखाद्याच्या अंत्यविधीला जातो तेव्हा म्हणतो की आपण रिकाम्या हाताने जन्म घेतो आणि पुन्हा रिकाम्या हातानेच जातो. पण यातलं काहीच खरं नाही.

ना आपण रिकाम्या हाताने येतो आणि ना आपण रिकाम्या हाताने जातो. प्रत्येक आत्मा त्याचे संस्कार आणि कार्मिक खाती बरोबर घेऊन जन्माला येतो. तो आत्मा आयुष्यभरात जे काही यश मिळवतो आणि साठवतो संपत्ती, पद,

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**पहिला मित्र :** अरे तू जिमला जातोय का?

**दुसरा :** हो रे, फक्त फोटो काढायला आणि घरी यायला!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* संयुक्त राष्ट्रसंघाचे मुख्यालय कोठे आहे?

– न्यूयॉर्क, अमेरिका

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### शेवगा

१४. पोटातील जंत शौचावाटे पडून जाण्यासाठी शेवग्याच्या काढ्यात मध घालून दिवसातून दोन वेळा एक-एक कप घ्यावा.

१५. केसांचे आरोग्य सुधारण्यासाठी व त्यातील कोंडा कमी होण्यासाठी शेवग्याच्या पानांचा रस केसांच्या मुळाशी लावावा व त्यानंतर अर्ध्या तासाने केस धुतल्यास कोंडा कमी होऊन केस मऊ मुलायम होतात.

सावधानता :

शेवग्याच्या शेंगा या अति कोवळ्या व अति जून झालेल्या वापरू नये. कोवळ्या वापरल्यामुळे त्यात शरीरास आवश्यक असलेल्या गुणधर्मांची वाढ झालेली नसते, तर अति जून शेंगा या उष्ण व दाहकारक असतात. तसेच आहारामध्ये आरोग्य चांगले राखण्यासाठी शेंगांबरोबरच पाने व फुले यांचाही नियमित वापर करावा. फक्त पाने वापरताना ती कोवळी वापरावीत.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००




निरंजन सेवाभावी संस्थेच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कीटचे वितरण करताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व संस्थेचे पदाधिकारी.

# निरंजन सेवाभावी संस्थेकडून ७०० गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व

## विद्यार्थ्यांना वर्षभराची शैक्षणिक साहित्याच्या किटचे वितरण

नगर – जिल्हा परिषदेच्या शाळा आजही अनेक खाजगी शाळांपेक्षा अधिक दर्जेदार शिक्षण देत आहेत. त्यामुळे या शाळांचे अस्तित्व टिकविणे ही काळाची गरज असून, त्या मॉडेल स्कूल म्हणून विकसित करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना आणि दानशूर व्यक्तींनी पुढाकार घ्यावा. जिल्हा परिषद शाळा टिकल्या नाहीत तर शिक्षणाचे बाजारीकरण होईल आणि त्याचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांना बसेल. त्यामुळे गावागावातील शाळांची जबाबदारी स्वीकारून त्यांना सक्षम करण्यासाठी समाजाने पुढे यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले.

निरंजन सेवाभावी संस्थेच्या वतीने १४ वर्षांपासून संस्था गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक पालकत्वाची संकल्पना राबवत असून, यंदा तब्बल ३ हजार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पालकत्वाचा संकल्प प्रत्यक्षात उतरविण्यात आला आहे. तसेच अहिल्यानगर मधील जिल्हा परिषद व इतर शाळांमधील गरजू घटकातील ७०० विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी आवश्यक शैक्षणिक किटचे वितरण करुन शैक्षणिक पालकत्व उपक्रम राबविण्यात आला. यावेळी भंडारी बोलत होते. माऊली सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास उद्योजक अनुराग धुत, उद्योजक राघवेंद्र बिहाणी, उद्योजक कमलेश झंवर, जिल्हा परिषद सीएसआर समितीचे रमेश कासार निरंजन संस्थेचे अतुल डागा, जयेश कासट, स्वप्निल कुलकर्णी, राहुल झंवर, मुकुंद धुत, सुमित चांडक, राहुल ओझा, दिनेश भाटिया, अभिजीत बिहानी, योगेश सिकची, पियुष झंवर, गोविंद दरक, सिद्धार्थ झंवर,पवन बंग, सौ. प्राजक्ता डागा, रोहन मंत्री, प्रसाद बजाज, वैभव जाधव यांच्यासह संस्थेचे सदस्य, शालेय शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात निरंजन सेवाभावी संस्थेचे अतुल डागा यांनी सांगितले की, भावी पिढी शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम घडावी या उद्देशाने गेल्या १४ वर्षांपासून शैक्षणिक पालकत्वाचा उपक्रम राबविला जात आहे. नुकतेच पुणे येथे २ हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक पालकत्व देण्यात आले असून, अहिल्यानगरमध्ये सध्या ७०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट देण्यात आली आहे. याशिवाय लवकरच आणखी ३०० विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी शैक्षणिक किटचे वितरण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योजक अनुराग धुत म्हणाले की, देश घडविणारी भावी पिढी शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत दिशादर्शक आहे. विद्यार्थ्यांचे भवितव्य शिक्षणातूनच घडणार असून, आजची मुले ही उद्याच्या भारताचे सक्षम नागरिक आणि देश घडविणारे युवक ठरणार असल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. जे. प्रसन्न जोशी यांनी केले, तर आभार स्वप्निल कुलकर्णी यांनी मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## जो दुसऱ्यावरी विश्वासला







अनेकांचा असतो जग जिंकण्याकडे ओढा. इच्छांनी, वासनांनी त्याला सदा घातलेला वेढा, मग तो म्हणतो, त्याच्यापुढं हात जोडा, त्याच्या मार्गात कुणी घालेल खोडा तर म्हणेल, खुशाल त्याचे हातपाय तोडा.

अरे, पण त्याचे हे प्रताप इतर कसे सहन करतील ? ते एक होतील. त्याला हैराण करतील त्याला सळो की पळो करुन सोडतील. माझ्यासारखा नाही कुणी कर्तबगार। दुसरे तर असतात हाजीहाजी करायला वाकबगार। पण प्रसंग पडला, की ते कुणीच नाही येणार तुझ्या मदतीला। तो त्याच्याच स्वार्थात गुंतलेला. मग अशांच्या मदतीनं का धजायचं आपलं काम करायला त्यामुळे निर्माण व्हायच्या नसत्या विवंचना मनात। उगाच दुसऱ्याचे उपकार कशाला घ्याल माथी। आपले भाग्य आपल्याच बळकट हाती, सिंहाचा आदर्श असावा डोळ्यापुढती।

अनंत प्रकारच्या पशुंनी व्यापलेल्या घनदाट जंगलात सिंह आपल्याच ऐटीत फिरतो. सगळ्या पशुंचा तो राजाच ना ? ते जंगल म्हणजे त्याचे राज्यच ना ? सगळ्या पशुंवर धाक बसवतो आपल्याच बलशाली गर्जनेनं मानेवरची त्याची आयाळ, दाढा तीक्ष्ण धारदार नखे बळकट स्वतःची ही अवयवे हीच त्याची शस्त्रे तो इतरांवर कधी विसंबून नये म्हणूनच तो आपल्यात मस्तीत असे। स्वामी समर्थ रामदास म्हणतात. जो स्वये कष्टचि गेला तो चि भला। जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्यभाग बुडाला।

ज्याला स्वतःलाच कष्ट करण्याचे वेड, त्यालाच यश लाभते. जो दुसऱ्यावर अवलंबून राहतं तो सगळे गमावून बसतो। बहिणाबाई चौधरी म्हणतात. काया काया शेतामंधी धाम जिरव जिरव तेव्हां उगल उगल कायामधून हिरवं।

शेतात कष्ट केलं, तेव्हा कुठे शेत पिकले. काळ्या जमिनीतून हिरवे अंकूर बाहेर आले. अंगमेहनतीनेच हे साधले. कुणावर तरी सोपवले तर त्याने शेत झोपवले।

एक आजीची गोष्ट आहे. ती सांगायची, की एका गावात एकदा एक स्वामी आले. त्यांची पुजा करायला गावातले लोक धावले. देवदत्त आणि धनदत्त असे दोघे मित्र. तेही पुजेसाठी स्वामीकडे गेले. दोघांनीही पुजा केली. देवदत्ताने दोन पेढे स्वामींपुढे ठेवले. स्वामी प्रसन्नमुद्रेने हसले. त्यांनी त्याचे तुकडे करुन भक्तांना प्रसाद म्हणून वाटले. धनदत्त मात्र हिरमुसला झाला. त्याला पुजा तर साधली पण देवदत्ताप्रमाणं स्वामींपुढे दोन पेढे ठेवता आले नाहीत. पेढे आणायला त्याने नोकराला पाठवले होते. देवदत्त स्वतःच बाजारात जावून ते घेउन आला होता. धनदत्त मनातून नोकरावर रागावला. तेवढ्यात समोरून नोकर आला. धनदत्त सुखावला. कुठंय पेढे ? दे लोकर. नोकराला तो म्हणाला. नोकराने पेढे नाहीत म्हणून नकार दिला.अरे काय केलेस पैशाचे मग ? नाही पेढे घेतले. चांगले चार पेढे आले पाच रुपयांत मग कुठे आहेत ते ? दोन घाईत जमिनीवर पडले. म्हटले हे मातीत पडले तुम्ही खाणार नाहीच म्हणून मी खाउन टाकले. बरं बरं, पण उरलेले दोन कुठे आहेत ? तुम्ही नेहमी पेढे आणता तेव्हा दोन मला शेवटी नाही तरी देताच. ते मी आधीच घेउन खाउ शकले। धनदत्ताने कपाळावर हात मारले।

– किशोर गांधी

# डॉ.प्रकाश व डॉ. सुधा कांकरिया यांचा आयकॉन्स् ऑफ हेल्थ केअर पुरस्काराने सन्मान; बोर्डीकर यांच्या हस्ते गौरव

नगर – येथील साई सूर्य नेत्रसेवा हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रकाश व डॉ. सुधा कांकरिया यांना टाईम्स आयकॉन्स ऑफ हेल्थ केअर २०२६ या पुरस्काराने राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार प्रदान सोहळा छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल गेटवे येथे पार पडला.

या कार्यक्रमास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे व्यवस्थापक मनोहर वाडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना राज्यमंत्री बोर्डीकर यांनी म्हणाल्या, सर्वसामान्यांसाठी डॉक्टर देवासारखा आहे. राज्य आणि देशातले डॉक्टर्स नागरिकांचे आरोग्य चांगलं ठेवण्याचं मोलाच काम करत आहेत. चांगले काम करणाऱ्यांची पाठ थोपटली तर त्यांना काम करण्याची प्रेरणा मिळते. नागरिकांचे आरोग्य चांगलं असेल तर देश प्रगती करू शकतो आणि तेच काम आपले डॉक्टर्स प्रामाणिकपणे करत आहेत. मी सर्वांचे अभिनंदन करते.

अधिष्ठाता सुक्रे म्हणाले, मराठवाडा हे एक मेडिकल हब म्हणून स्वत:ची ओळख निर्माण करत आहे. आरोग्यसेवा क्षेत्रातल्या व्यावसायिकांची निष्ठा, उत्कृष्टता आणि निस्वार्थ सेवेचा आम्ही गौरव करतो. अशा व्यासपीठांमुळे डॉक्टर आणि रूग्णालयांना रूग्णसेवा दर्जा उंचावणं, नाविण्यपूर्ण पध्दतीचा स्विकार आणि समाजाच्या हितासाठी आरोग्यसेवा बळकट करण्यासाठी प्रेरणा मिळते, असे ते म्हणाले.




छत्रपती संभाजीनगर येथील कार्यक्रमात राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ. प्रकाश व डॉ. सुधा कांकरिया.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या, हा विशेष सन्मान म्हणजे ४० वर्षांच्या आमच्या साई सूर्य नेत्रसेवा या संस्थेला मिळालेली पावती आहे. अशा प्रकारच्या सन्मानामुळे अधिक प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळते. निरोगी भारत, समृध्द भारत हे आपणा सर्वांचे स्वप्न आहे. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्व डॉक्टर्स झटत आहेत, त्यांचेही मी अभिनंदन करते. १९८५ साली स्थापन झालेली साई सूर्य नेत्रसेवा ही एक आंतरराष्ट्रीय दर्जाची संस्था असून त्याद्वारे लाखो अंध बांधवांना दृष्टी प्राप्त झाली आहे. चष्म्याचा नंबर कॉम्प्युटरवर काढण्यापासून ते अत्याधुनिक लेसर किरण प्रणाली साई सूर्य नेत्रसेवा येथे उपलब्ध आहे. मोतीबिंदू, काचबिंदू, तिरळेपणा तसेच चष्म्याचा नंबर कॉन्ट्यूरा लेसर प्रणालीने घालविणे हे या संस्थेचे वैशिष्टय आहे. डॉ. प्रकाश कांकरिया हे या लेसर प्रणालीचे जनक असून आजपर्यंत त्यांनी लाखो नेत्र रूग्णांना दिलासा दिला आहे. त्यांचे नाव लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्मध्ये झळकले आहे. लग्नाच्या उपवर मुलींसाठी तसेच कलाक्षेत्रात कार्य करणाऱ्या तरूणाईसाठी चष्मा घालविणे हे तंत्रज्ञान वरदान ठरत आहे. नेत्रपेढीच्या माध्यमातून नेत्रदानाची चळवळ बळकट करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. नेत्रदानाविषयीचे गैरसमज दूर करण्यासाठी समाजप्रबोधन व लोकशिक्षणाची माहिती दृष्टी या पुस्तकाचे लेखन करून सर्व दूर पोहचवली आहे. मानकन्हैय्या नेत्रपेढीला महाराष्ट्र शासनाचा प्रथम क्रमांकाचा उत्कृष्ट नेत्रपेढी हा पुरस्कार प्राप्त झाला आहे, असे त्यांनी सांगितले.



आषाढी एकादशीनिमित्त वि. ल. कुलकर्णी प्राथमिक शाळेत बालदिंडी काढण्यात आली.

# ध्वनी प्रदूषण विरहित दिंडीत रंगले वि.ल.कुलकर्णी शाळेचे बाल वारकरी

नगर – आषाढी एकादशीनिमित्त वि. ल. कुलकर्णी प्राथमिक शाळेत भक्तिमय वातावरणात दिंडीचे आयोजन करण्यात आले.

वारकरी वेशातील विद्यार्थ्यांनी टाळ, भगवे ध्वज, तुळशीची रोपे हातात घेऊन माऊली, माऊली, विठ्ठल विठ्ठल, जय हरी विठ्ठलच्या गजरात शाळेच्या परिसरातून दिंडी काढली. विद्यार्थ्यांच्या वारकरी नृत्यातून, शिक्षकांनी गायलेल्या अभंगातून हरिनामाचा गजर करत समाजात श्रद्धा, भक्ती आणि एकतेचा संदेश देत बाल वारकरी उत्साहात दिंडीत पायी वाट चालत होते. विठ्ठल रखुमाई, ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम, मुक्ताबाई, संत नामदेव यांच्या वेशभूषेत असलेल्या विद्यार्थ्यांमुळे सोहळा आणखीनच नयनरम्य झाला. आषाढ सरींची पर्वा न करता या दिंडीत शाळेच्या मुख्याध्यापिका भारदे तसेच सर्व शिक्षक यांच्यासह संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी रेखे, चंद्रशेखर कुलकर्णी, किरण वैकर, उमेश रेखे, महेश रेखे, उदयकुमार भणगे यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

# ओंकार संगीत निकेतनतर्फे स्वर पंढरी अभंग-भक्तिगीतांची सुरेल मैफल संपन्न

नगर – आषाढी एकादशीचे औचित्य साधून ओंकार संगीत निकेतनतर्फे आयोजित स्वर पंढरी या अभंग-भक्तिगीतांच्या सुरेल मैफलीने रसिकांना भक्तिरसात चिंब भिजविले. भिंगार येथील विद्यालयाच्या मालती हॉलमध्ये संपन्न झालेल्या या कार्यक्रमात विठ्ठलभक्तीचा नाद, सुरांची माधुरी आणि तालाची मनोहारी साथ यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.



ओंकार संगीत निकेतनतर्फे आयोजित स्वर पंढरी या अभंग-भक्तिगीतांच्या सुरेल मैफलीत सहभागी विद्यार्थी.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संतश्रेष्ठांच्या अभंगांसह विविध भक्तिगीतांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मनापासून दाद मिळविली. नाम गाऊ नाम घेऊ, अबीर गुलाल उधळीत रंग, खेळ मांडियेला, विठुमाऊली तू माऊली जगाची, फिरत्या चाकावरती, माझे माहेर पंढरी, पंढरीचा वास, मनात भरली पंढरी, धनी मलाही दाखवा ना, धागा धागा अखंड विणूया, सुंदर ते ध्यान, किती सांगू मी सांगू कुणाला, धरिला पंढरीचा चोर, ज्या सुखा कारणे देव वेडावला, आली कुठूनशी कानी, एकतारी संगे, चंद्रभागेच्या तीरी, माऊली माऊली, कानडा राजा पंढरीचा तसेच अवघे गर्जे पंढरपूर यांसारख्या अभंग-भक्तिगीतांनी संपूर्ण सभागृह भक्तिमय वातावरणाने भारावून गेले.

कार्यक्रमासाठी संवादिनीची साथ संगीता देऊळगावकर, ओंकार देऊळगावकर व गायत्री धनलगडे यांनी केली. तबल्यावर अनुज दरवडे, तर तालवाद्यावर मीनाक्षी सरोदे यांनी समर्थ साथसंगत केली. सूत्रसंचालन पूर्वा लकारे यांनी ओघवत्या आणि प्रभावी शैलीत केले.

या मैफलीत अवनी गाढे, गौरी घोलप, स्वराली गावडे, ओवी भुजबळ, प्रेम मजूकर, प्रणिती थोरात, ज्योती भिंगारदिवे, संगिता नागपुरे, आरोही सरोदे, श्रावणी व्यवहारे, आश्रिज्ञा कुसाळकर, स्निग्धा कुंडु, मयूरी पाठक, मयूरी देशपांडे, लक्ष्मी गायकवाड, मेधा बकरे, स्नेहल धाडगे, जयदीप कार्ले, विराज लवांडे, दिक्षा घोडके, प्राप्ती वाघुंबरे, आरोही शिंदे, पार्थो नाथ, श्रेया पंडित, प्रज्ञा नवले, गौरी विधाटे, वैभवी चव्हाण, संस्कृती कोठुळे, सान्वी मूरूमकर, मयुरी ओमसे, पायल राऊत, श्रद्धा शिंदे, श्लोक थिटे आणि वैष्णवी चव्हाण या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपल्या सुरेल सादरीकरणाने कार्यक्रमाची उंची अधिकच वाढविली.

सुर, ताल आणि भक्तीचा त्रिवेणी संगम घडविणाऱ्या या मैफलीने उपस्थित रसिकांना विठ्ठलनामाच्या अखंड गजरात तल्लीन केले.

# साई संघर्ष प्रतिष्ठानचा द्वारकामाई साई मंदिरात गुरुपौर्णिमा महोत्सव; किर्तन, आरोग्य शिबीर, रक्तदान व महाप्रसादाने भक्ती-सेवेचा संगम

नगर – माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके यांच्या पुढाकारातून आणि साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित करण्यात आलेला भव्य धार्मिक महोत्सव यंदाही भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. वसंत टेकडी, संदेशनगर येथील द्वारकामाई साई मंदिरात सलग दोन दिवस विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.




साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून गुरुपौर्णिमेनिमित्त दोन दिवसीय महोत्सव घेण्यात आला.

महोत्सवाची सांगता श्री क्षेत्र देवगड संस्थानचे लक्ष्मण महाराज नांगरे यांच्या ओजस्वी कीर्तनाने करण्यात आली. त्यांच्या निरूपणाने उपस्थित भाविक भक्तिरसात तल्लीन झाले. धार्मिक कार्यक्रमाबरोबरच समाजोपयोगी उपक्रमांनाही विशेष महत्त्व देण्यात आले. इंडो आयरिश हॉस्पिटल यांच्या सहकार्याने परिसरातील नागरिक व भाविकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषध वाटप शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच साईसेवा ब्लड सेंटरच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या दोन्ही उपक्रमांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला.

या कीर्तन सोहळ्यास महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका गौरी बोरकर, हरप्रीतकौर गंभीर, संध्या पवार, वर्षा सानप, रोशनी त्र्यंबके माजी नगरसेविका रुपाली वारे, किरणताई बारस्कर, सविता मोरे, नगरसेवक महेश तवले, मयूर शिंदे, रोहन सानप आदी उपस्थित होते. माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके यांच्या प्रयत्नातून सुरू असलेल्या या उपक्रमाचे यंदा तेरावे वर्ष असून, प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी परिसरातील नागरिकांना एकत्र आणून द्वारकामाई साई मंदिराच्या प्रांगणात विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. तसेच समाजातील दानशूर नागरिकांच्या सहकार्याने उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली जाते.

यंदाच्या गुरुपौर्णिमा महोत्सवानिमित्त प्रमिला चंद्रकांत सिंग ठाकूर यांच्या तर्फे राहुल ठाकूर व ठाकूर परिवाराच्या वतीने सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. ठाकूर परिवाराच्या या सामाजिक व धार्मिक योगदानाबद्दल साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्री साईंची आरती करण्यात आली. त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. भक्ती, समाजसेवा आणि आरोग्य जनजागृतीचा सुंदर संगम घडविणारा हा गुरुपौर्णिमा महोत्सव परिसरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला.



सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने 'चित्ती असू द्यावे समाधान' या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलताना वैद्य अनिकेत घोटणकर.

# मनाची स्थिरता म्हणजेच समाधानाची स्थिती होय

## डॉ. अनिकेत घोटणकर यांचे प्रतिपादन; सावेडीत 'चित्ती असू द्यावे' समाधान विषयावर व्याख्यान

नगर – शरीर व मन यांचा संबंध खूप जवळचा आहे. म्हणून सकारात्मक विचाराने मनावरचा ताण योग केल्याने कमी होतो. चित्तामध्ये समाधान नसल्याने शरीरात अनेक रोग, व्याधी निर्माण होतात. योगस् चित्त वृत्ती निरोध:असे म्हटले जाते. पतंजली योग सांगते, 'अथ: योगा अनुशासनम्' मन हे अत्यंत चंचल आहे. ते नेहमीच संकल्प विकल्प करीत असते. म्हणूनच मनाची स्थिरता म्हणजेच समाधानाची स्थिती होय. असे प्रतिपादन वैद्य.अनिकेत घोटणकर यांनी केले.

सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने 'चित्ती असू द्यावे समाधान' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्ष शरद कुलकर्णी, एस आर जोशी, ज्योती केसकर, पुष्पा चितांबर, बलभीम पांडव, शुभदा जहागीरदार, आदिनाथ जोशी, स्नेहल वेलणकर, चारुशीला करवंदे, दिलीप जोशी, सतीश सातभाई श्रीकांत नाईक, डॉ. पोतणीस, सर्वोत्तम क्षीरसागर, संतोष गोरे उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, जीव जन्माला आल्यापासून सत्व, रज, तम या त्रिगुणाचे प्राबल्य प्रत्येकाच्या शरीरात कमी जास्त प्रमाणात व त्या त्या परिस्थितीनुसार होत असते. पूर्वकर्मानुसार प्रत्येकाला जन्म मिळत असतो. आणि जे संचित कर्म असते त्याप्रमाणे प्रत्येकाला सुख दुःख भोगावे लागते. म्हणून प्रत्येकाने कर्म चांगले करावे. जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात 'चित्ती असू द्यावे समाधान'. यावेळी, मंचच्या वतीने सभासदांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. आदिनाथ जोशी यांनी ७५ वर्ष पूर्ण व पुष्पा चितांबर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. गीताराम घोटणकर यांनी मंचास एक हजार एक रूपयांची देणगी जाहीर केली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन बाजीराव जाधव यांनी केले तर पुष्पा कोरे यांनी आभार मानले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



नागापूर जि.प.शाळेचे मुख्याध्यापक चाँद शेख यांचा पुरस्काराने गौरव करताना माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे आणि सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधर आदी.

## मुख्याध्यापक चाँद शेख यांचा पुरस्काराने गौरव

नगर – शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना नगर तालुका तालिम सेवा संघाच्या वतीने राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय क्रीडा रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आषाढी एकादशी आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून निमगाव वाघा (ता. नगर) येथे आयोजित करण्यात आलेल्या 'जगतगुरू संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' या सोहळ्यात उद्योजक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे आणि सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधर यांच्या हस्ते चाँद शेख यांना मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला स्वागताध्यक्ष ॲड. आनंद सूर्यवंशी, संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते अशोक सूर्यवंशी, अनिताताई खरात, विशेष सरकारी वकील ड. सुरेश लगड, उद्योजक दिलावर शेख, निमगाव वाघा सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, डॉ. विजय जाधव, भाऊसाहेब ठाणगे यांच्यासह साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि नागरिक उपस्थित होते.

मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांनी शिक्षक म्हणून कार्यरत असताना अनेक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन त्यांना उज्वल भविष्याची दिशा दिली आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले. ते स्वत: एक उत्कृष्ट कुस्तीपटू होते, त्यांनी अनेक खेळाडू देखील घडविले आहे. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र असावे, या विचारातून त्यांनी सातत्याने काम केले आहे.

शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. ग्रामस्थांच्या सहकार्याने शाळांच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत त्यांना राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय क्रीडा रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# अंबिका महिला सह.बँकेच्या संचालकपदी मरकड, वाघ, अनभुले, मांढरे यांची निवड

नगर – देशात महिला बँक चळवळीमध्ये अग्रेसर असलेल्या अंबिका महिला सहकारी बँकेच्या चार रिक्त झालेल्या जागेवर नवीन संचालकांची निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून सहाय्यक उपनिबंधक बाळकृष्ण शिंदे यांनी काम पाहिले. रिक्त झालेल्या या चार पदावरती नवीन संचालिका भरण्यासाठी संचालक मंडळाची विशेष सभा शनिवारी बोलवण्यात आली होती. यावेळी सौ.वैशाली किशोर मरकड, सौ. शिल्पा अभिजीत वाघ, सौ.डॉ. सौ.दिपाली भूषण अनभुले, सौ.आरती सुनील मांढरे साबळे यांची नियुक्ती करण्यात आली.



सौ. वैशालीताई मरकड



सौ. शिल्पाताई वाघ



डॉ. सौ. दिपालीताई अनभुले



प्रा. सौ. आरतीताई मांढरे

बँकेच्या विद्यमान संचालिका प्रा. पुष्पाताई मरकड, प्रा. पुष्पलता वाघ, सविता गांगर्डे यांच्या निधनानंतर तसेच प्रकृतीच्या कारणाने डॉ. क्रांतीकला अनभुले यांनी दिलेल्या राजीनाम्यांमुळे या जागा रिक्त झाल्या होत्या. त्या रिक्त जागी नवीन संचालिकांना घेण्यात आले. यावेळी सौ वैशाली मरकड यांच्या नावाची सूचना सौ.भारती आठरे यांनी केली तर सौ.शोभना चव्हाण यांनी अनुमोदन दिले. सौ शिल्पा वाघ यांच्या नावाची सूचना सौ. आशा मिस्कीन यांनी केली ॲड. विजया काकडे यांनी अनुमोदन दिले.डॉ. दिपाली अनभुले याच्या नावाचे सूचना ॲड. शारदा लगड यांनी केली तर अनुमोदन सौ. शोभाताई खरपुडे यांनी दिले. सौ. आरती मांढरे यांच्या नावाची सूचना प्रा. संध्या जाधव यांनी केली आणि प्रा. मेधा काळे यांनी अनुमोदन दिले.

यावेळी बोलताना संस्थापिका व विद्यमान संचालिका प्रा. मेधाताई काळे म्हणाल्या की बँकेच्या स्थापनेपासून मरकड ताई व वाघ ताईंचे महत्त्वपूर्ण योगदान होते. तसेच पुढील काळात अनभुले व गांगर्डे यांनी बँक चळवळ वाढीसाठी अथक परिश्रम घेतले आहे. त्यांचा त्याग ही नवीन पिढी समोर ठेवून बँक विकासासाठी चालना देईल. निवड करताना उच्च पदवीधर, समाजामध्ये काम करण्याची आवड या गोष्टींचा विचार करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना अध्यक्ष शांता मोरे म्हणाल्या की आज अखेर बँकेच्या २२५ कोटींचा व्यवसाय असून १३३ कोटी ठेवी व ९१ कोटी कर्ज वाटप आहे. बँकेचा एनपीए ०% राहिला आहे नियमित लेखापरीक्षण ऑडिट वर्ग ''अ'' आहे. बँकेने आरबीआयचे सर्व निकष पूर्ण केले असून पाच शाखांसह संगणक युक्त प्रणालीचा बँक वापर करत आहे. त्यामुळे बँकिंग क्षेत्रात महिला बँकेचा उत्तम कारभार लक्षात घेता यावर्षीचा महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह फेडरेशनचा महाराष्ट्रातील राज्यात महिला गटातून सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार तसेच देश व राज्यातील अनेक पुरस्कार बँकेला मिळालेले आहेत. कर्ज देताना अतिशय काटेकोरपणे पालन केल्याने बँक चांगल्या स्थितीत असल्याचे उपाध्यक्ष सौ.सुमनताई गोसावी यांनी सांगितले.

यावेळी नवनिर्वाचित संचालिका यांचेही भाषणे झाली. यावेळी बोलताना सहाय्यक उपनिबंधक बाळकृष्ण शिंदे म्हणाले की, महिला एकत्र येऊन सामाजिक भावनेतून महिलांप्रती आदर युक्त करून एक चांगली बँक चालू शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे गेले ३९ वर्ष अविरत चाललेली अंबिका महिला बँक आहे. ही चळवळ नसून महिलांना आर्थिक पाठबळ देणारी एक आधार संस्था आहे. याचा आम्हाला अभिमान आहे.

यावेळी ज्येष्ठ संचालिका सौ.सरोजिनी चव्हाण, सी.ए. ज्ञानेश्वर काळे, कार्यकारी अधिकारी अंकुश गायकवाड, मराठा पतसंस्थेचे संचालक किशोर मरकड, अभिजीत वाघ, शहर बँकेचे संचालक डॉ. भूषण अनभुले, प्रा.सुनील मांढरे, प्रा. राजेंद्र साबळे, नितीन मरकड, शिक्षक बँकेच्या अधिकारी शुभांगी मरकड आदी उपस्थित होते.



सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल येथे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी आदान–प्रदान कार्यक्रम पार पडला.

## सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय विद्यार्थी आदान–प्रदान कार्यक्रम

नगर – श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल येथे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी आदान–प्रदान कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमासाठी डेन्मार्कचे एलियट, हंगेरीचे मॅथियास, बेल्जियमच्या ईव्हा तसेच लिओ क्लबचे अध्यक्ष गुरनूर वधवा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक तिलक व हार घालून स्वागताने झाली. विद्यार्थ्यांनी स्वागतगीत, टेराकोटा कुंडी, योग प्रात्यक्षिक, लेझीम, भरतनाट्यम तसेच विविधतेत एकता या देशभक्तिपर समूह नृत्याद्वारे भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले.

कार्यक्रमातील संवाद सत्रात विद्यार्थ्यांनी परदेशी पाहुण्यांशी शिक्षण, संस्कृती, परंपरा, भाषा आणि भारतातील अनुभव याविषयी उत्स्फूर्त संवाद साधला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये जागतिक दृष्टीकोन, विविध संस्कृतींचा आदर आणि आंतरराष्ट्रीय मैत्रीची भावना अधिक दृढ झाली.

कार्यक्रमासाठी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्या गगन वधवा, समन्वयक सुषमा उजागरे, श्रेयकुमार गुंडू, शिक्षक रोथेल लोंढे आदींनी सहकार्य केले. वसुधैव कुटुंबकम् – संपूर्ण विश्व हेच एक कुटुंब आहे हा संदेश या कार्यक्रमातून प्रभावीपणे अधोरेखित झाला.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसकडून अभिवादन



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसकडून पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

नगर – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या साहित्यिक, सामाजिक आणि परिवर्तनवादी कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या प्रभावी लेखणीतून आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजातील वंचित, कष्टकरी, श्रमिक आणि शोषित घटकांचा आवाज बुलंद केला. सामाजिक विषमता, अन्याय आणि शोषणाविरोधात त्यांनी आपल्या साहित्याद्वारे जनजागृती केली. त्यांचे कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे आणि दिशा दाखविणारे आहे.

ते पुढे म्हणाले की, माझी मैना गावाकडे राहिली हे अण्णाभाऊ साठे यांचे सर्वाधिक गाजलेले लोकगीत आहे. वरकरणी ते विरहगीत वाटत असले तरी त्यामागे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा प्रभावी राजकीय संदेश दडलेला होता. लोकगीत आणि लोककलेच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचे, जनजागृती करण्याचे आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे मोठे कार्य त्यांनी केले. त्यांच्या विचारांचा आदर्श आजच्या युवा पिढीने अंगीकारणे ही काळाची गरज आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये तसेच देशाच्या सामाजिक क्रांतीत आणि श्रमिकांच्या हक्कासाठी आणि वंचित समाजाच्या हितरक्षणासाठी त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे ते म्हणाले

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या अभिवादन कार्यक्रमास शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्यासह अजय दिघे, दीपक खेडकर, सुरज शिंदे, ऋषिकेश रासकर, तुषार यादव, राहुल कातोरे, आकाश बारस्कर, प्रा. भगवान काटे, सारंग पंधाडे, परेश पुरोहित, नितीन घोडके, आनंद राठोड, जालिंदर वाल्हेकर, राहुल शिंदे, मुसला धनगर, योगेश एरंडे उपस्थित होते.



आंतरशालेय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत यश मिळविणाऱ्या द आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनी.

# इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत 'आयकॉन'च्या विद्यार्थिनींची चमकदार कामगिरी

नगर – शहरातील सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूलच्या वतीने आयोजित आंतरशालेय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत द आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी प्रभावी वक्तृत्व आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणातून आपला ठसा उमटविला.

शाळेचे प्रतिनिधित्व करत आरना प्रसन्न कटारे आणि समायरा शाहिद काझी यांनी इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, स्पष्ट उच्चार, प्रभावी मांडणी आणि उत्तम रंगमंचीय उपस्थिती यांचे उत्कृष्ट दर्शन घडविले. त्यांच्या प्रभावी सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

या स्पर्धेमुळे विद्यार्थिनींना सार्वजनिक वक्तृत्वकला, चिकित्सक विचारसरणी, प्रभावी संवादकौशल्य आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करण्याची मौल्यवान संधी मिळाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरतात, याची पुन्हा एकदा प्रचिती आली. शाळेच्या व्यवस्थापनाने सहभागी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच स्पर्धेसाठी विद्यार्थिनींना सातत्याने मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांच्या समर्पित प्रयत्नांचेही विशेष कौतुक करण्यात आले.

शरद मुथा एज्युकेशन ट्रस्टच्या अध्यक्षा मंगला मुथा, अध्यक्ष अशोक मुथा, विश्वस्त निर्मल मुथा, अमित मुथा, संचालक (प्रशासन) कर्नल आर. सी. राणा, संचालिका आराधना राणा तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला यांनी सहभागी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून भविष्यातही अशाच स्पर्धांमध्ये यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाचा ६१ वा वर्धापन दिन उत्साहात

नगर – मुलींना उत्तम शिक्षण व संस्कार मिळावे, मुलींची शैक्षणिक प्रगती व्हावी, या उद्देशाने ही शाळा सुरू करण्यात आली आहे. या शाळेतील मुलींनी केलेली प्रगती कौतुकास्पद आहे. शाळेतील सर्व शिक्षक अत्यंत तळमळीने ज्ञानदानाचे कार्य करीत असल्याने विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेत यश मिळत आहे. श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाची ६१ वर्षाची परंपरा गौरवास्पद आहे, असे प्रतिपादन स्कूल कमिटी सदस्य प्रा. शिरीष रायते यांनी केले आहे.



श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

हिंदसेवा मंडळ संचलित श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाचा ६१वा वर्धापन दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश वाटप करण्यात आले. तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय समिती सदस्य प्रा. शिरीष रायते, प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त प्रा. अविनाश मुंडके, हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अजित बोरा, भाईसथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, शालेय समिती सदस्य अशोक कानडे, मुख्याध्यापिका रोहिणी फळे, बि. यु. कुलकर्णी, बबन धनवडे, नितीन केने, सुखदेव नागरे, वृषाल एकबोटे, वैशाली दारवेकर, अनघा देवचक्के, माहेश्वरी कुलकर्णी आदी उपस्थित होते.

अजित बोरा यांनी वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून शाळेच्या नाव लौकिकात भर घालावी, असे सांगितले.

डॉ. पारस कोठारी म्हणाले, हिंदसेवा मंडळ ही शतकोत्तर वाटचाल करणारी संस्था आहे. तसेच श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाने यशस्वीपणे ६१ वर्षे पूर्ण केली आहेत. विद्यार्थ्यांनी शिक्षक व गुरुजनवर्गांचा आदर बाळगावा. चांगले शिक्षण घेऊन शाळेचे नाव उज्वल करावे.

मुंडके म्हणाले, वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणारी ही मुलींची शाळा आहे. मुलींची शैक्षणिक व सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी विशेष लक्ष दिले जाते. शाळेतील विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहावे. मोबाईलच्या दुष्परिणामामुळे अनेकांचे मनोबल कमी होत आहे. पर्यावरणाचे रक्षण करावे. व प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक तरी झाड लावण्याचा प्रयत्न करावा.

अशोक कानडे म्हणाले, श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाची प्रगती कौतुकास्पद आहे. हिंद सेवा मंडळाने मुलींच्या कलागुणांचा विकास व्हावा. या हेतूने मुलींची शाळा सुरू केली आहे. या शाळेचा जिल्ह्यात नावलौकिक आहे. शाळा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून मुलींना स्कूल बसची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच शालेय साहित्य व गणवेश चे वाटप करण्यात येते.

सूत्रसंचालन वैशाली दारवेकर यांनी केले. आभार वृषाल एकबोटे यांनी मानले.

# 'स्टुडंट ऑफ द डे'
## कौतुकातून घडतो आदर्श विद्यार्थी

आजच्या शिक्षणात केवळ पुस्तकातील ज्ञान देणे पुरेसे नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी, शिस्त, आत्मविश्वास आणि जबाबदारीची भावना निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या छोट्या–छोट्या चांगल्या कृतींचे वेळेवर कौतुक झाले, तर त्यांना आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. हीच भावना लक्षात घेऊन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोसपुरी येथे स्टुडंट ऑफ द डे हा नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे.



या उपक्रमामध्ये दररोज वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचे दिवसभर निरीक्षण केले जाते. नियमित अभ्यास, वेळेवर शाळेत येणे, गृहपाठ पूर्ण करणे, वर्गातील शिस्त, स्वच्छता, शिक्षकांचा आदर, मित्रांना सहकार्य, नम्र वर्तन आणि उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग अशा विविध बाबींचा विचार करून त्या दिवसाचा स्टुडंट ऑफ द डे निवडला जातो.

या उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांची निवड केवळ शिक्षक करत नाहीत, तर वर्गातील विद्यार्थीही आपल्या सहाध्यायांपैकी चांगले काम करणाऱ्या विद्यार्थ्याची शिफारस करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकमेकांचे गुण ओळखण्याची, इतरांच्या यशाचे कौतुक करण्याची आणि सकारात्मक विचार करण्याची सवय लागते.

निवड झालेल्या विद्यार्थ्याचा संपूर्ण वर्गासमोर टाळ्यांच्या गजरात सन्मान केला जातो. विशेष म्हणजे, बक्षीस शिक्षकांच्या हस्ते न देता वर्गातील दुसऱ्या विद्यार्थ्यांच्या हस्ते दिले जाते. या छोट्याशा कृतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये परस्पर आदर, मैत्री आणि सहकार्याची भावना अधिक दृढ होते.

सन्मानित विद्यार्थ्याचा फोटो शाळेच्या पालकांच्या व्हॉट्सॲप समूहावर शेअर केला जातो. त्यामुळे पालकांना आपल्या मुलांच्या दैनंदिन प्रगतीची माहिती मिळते. मुलांचे कौतुक पाहून पालकांनाही आनंद होतो आणि ते आपल्या पाल्याला अधिक चांगले काम करण्यासाठी प्रोत्साहन देतात. यामुळे शाळा आणि पालक यांच्यातील संवाद अधिक मजबूत होतो.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नियमित अभ्यासाची सवय वाढली आहे. वर्गातील शिस्त, वेळेचे पालन, स्वच्छता, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण यामध्ये सकारात्मक बदल दिसून येत आहेत. प्रत्येक विद्यार्थी आज नाही तर उद्या माझाही सन्मान होईल या भावनेने अधिक उत्साहाने प्रयत्न करू लागला आहे. त्यामुळे वर्गात आनंदी, प्रेरणादायी आणि सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

या उपक्रमासाठी कोणताही मोठा आर्थिक खर्च लागत नाही. विद्यार्थ्यांच्या चांगल्या कृतींचे वेळेवर कौतुक आणि योग्य प्रोत्साहन हेच या उपक्रमाचे यश आहे. छोट्या कल्पनेतून सुरू झालेला हा उपक्रम आज विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रभावी माध्यम ठरत आहे.

विद्यार्थ्यांचे कौतुक हीच त्यांच्या यशाची पहिली पायरी असते. योग्य वेळी मिळालेले प्रोत्साहन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करते आणि चांगला विद्यार्थी तसेच चांगला नागरिक बनण्याची प्रेरणा देते. त्यामुळे 'स्टुडंट ऑफ द डे' हा उपक्रम प्रत्येक शाळेसाठी प्रेरणादायी आणि अनुकरणीय ठरू शकतो.

बोधवाक्य : प्रत्येक दिवस नवी संधी... प्रत्येक विद्यार्थी आदर्श होऊ शकतो!

**– मनोज मच्छिंद्र काशीद**,
उपाध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोसपुरी
केंद्र – जेऊर, ता. अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर मोबाईल : ९४०४२४३३९९
ई–मेल : manojkashid2006@gmail.com

(लेखक हे उपक्रमशील शिक्षक असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवित आहेत.)

## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीत गुरुपौर्णिमा, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंतीचा संयुक्त कार्यक्रम



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीत गुरुपौर्णिमा, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंतीचा संयुक्त कार्यक्रम घेण्यात आला.

नगर – गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सुलोचना सप्तर्षी पूर्व प्राथमिक विभाग, वि. ल. कुलकर्णी प्राथमिक शाळा व प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या सर्व विभागांनी संयुक्तपणे गुरुपौर्णिमा व लोकमान्य टिळक पुण्यातिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी केली.

शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सरस्वती वंदनेने आणि स्वागत गीताने मंगलमय झालेल्या वातावरणात सर्व गुरुजनांचा सन्मान करण्यात आला. संस्थेच्या पदाधिकारी रेखे, चंद्रशेखर कुलकर्णी, किरण वैकर, उमेश रेखे, महेश रेखे, उदयकुमार भणगे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी गुरूंचे समाज जीवनातील स्थान अधोरेखित करत प्रथम गुरू आई – वडील आणि शिक्षकांचे आदर, शिस्त आणि संस्काराचे महत्त्व पटवून दिले. पुस्तकातून फक्त माहिती मिळेल. परंतु ज्ञान मिळवण्यासाठी गुरु हवेच, असे मत त्यांनी मांडले. आणि म्हणूनच गुरुजनांचा आदर सन्मान नित्य क्रमाने करण्याचा मोलाचा संदेश पाहुण्यांनी दिला.

या प्रसंगी गुरु महिमा सांगणारी तसेच लो. टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्याविषयी आदर व्यक्त करणारी भाषणे सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमात सर्व विभागांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांची उपस्थिती लाभली.

# अर्थजगत

पावसाळा सुरू झाला की निसर्गाचे सौंदर्य खुलून येते, परंतु त्याचबरोबर आरोग्यासमोर अनेक आव्हाने उभी ठाकतात. या ऋतूत डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढतो. याशिवाय टायफॉइड, कावीळ, अतिसार यांसारखे पाण्यापासून होणारे आजार आणि सर्दी, खोकला, श्वसनाचे विकारही डोके वर काढतात.

## पावसाळी आजार आणि आरोग्यविमा कवच



■ गुंतवणूक

हवामानातील बदलांमुळे आरोग्याला होणारा धोका टाळण्यासाठी आरोग्य विमा किती फायदेशीर ठरू शकतो आणि यात कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो, याची सविस्तर माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे.

आरोग्य विमा पॉलिसी साधारणपणे हॉस्पिटलायझेशन म्हणजेच रुग्णालयात दाखल होण्याचा खर्च कव्हर करते. जेव्हा एखाद्या व्यक्तीला डेंग्यू किंवा तीव्र संसर्गामुळे रुग्णालयात दाखल करावे लागते, तेव्हा उपचाराचा सर्व खर्च विमा कंपनीकडून दिला जातो. यामध्ये डॉक्टरांचे शुल्क, बेडचे भाडे, औषधोपचार आणि आवश्यक वैद्यकीय चाचण्यांचा समावेश असतो. मात्र, बऱ्याचदा लोकांना असा गैरसमज असतो की सर्व प्रकारच्या उपचारांचा खर्च यात समाविष्ट केला जातो. पण मूलभूत आरोग्य विमा पॉलिसींमध्ये बाह्यरुग्ण विभाग म्हणजेच ओपीडी, औषधोपचारांव्यतिरिक्त लागणारे साहित्य जसे की हँडग्लोव्हज, सिरिंज किंवा विशेष किट यांचा खर्च बऱ्याचदा वगळला जातो किंवा त्यावर काही मर्यादा असतात.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये उपचारासाठी होणारा खर्च सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला परवडणारा नसतो. खासगी रुग्णालयांमध्ये उपचाराचा प्रतिदिन खर्च पंचवीस हजार रुपयांपासून ते लाखांपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे लहान शहरांपासून मोठ्या महानगरांपर्यंत पावसाळ्याच्या दिवसांत विमा दाव्यांचे प्रमाण तब्बल दीडशे टक्क्यांनी वाढल्याचे दिसून येते. अशा वेळी आपल्याकडे असणारी विमा रक्कमेची मर्यादा वाढवणे गरजेचे ठरते. साधारणपणे पाच किंवा दहा लाख रुपयांपर्यंतचे कव्हर असणे आजच्या काळात आवश्यक मानले जाते.या ऋतूत अनेकदा एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त सदस्यांना आजारपण येऊ शकते. त्यामुळे एकाच वर्षात वारंवार रुग्णालयात दाखल व्हावे लागल्यास रिस्टोरेशन किंवा विमा रक्कम पुनर्स्थापनेचा लाभ असणाऱ्या पॉलिसींचा फायदा होतो. या फायद्यामुळे संपलेली विमा रक्कम पुन्हा पूर्ववत होते आणि पुढील उपचारांसाठी आर्थिक तजविजेची चिंता उरत नाही. याशिवाय, ज्या पॉलिसींमध्ये ओपीडी आणि डायग्नोस्टिक्सचा समावेश असतो, त्यांना ताप आल्यानंतर केल्या जाणाऱ्या रक्तपासण्या आणि डॉक्टरांच्या सततच्या फेऱ्यांचा खर्च उचलण्यास मदत मिळते.

काही विमा कंपन्या पावसाळी आजारांसाठी विशेष अल्प मुदतीच्या पॉलिसी देखील उपलब्ध करून देतात. यामध्ये ठराविक काळासाठी विशिष्ट आजारांविरुद्ध संरक्षण मिळते. अशा पॉलिसींमुळे हंगामी आजारांचा सामना करताना मोठी आर्थिक मदत मिळू शकते. योग्य वेळी घेतलेला आरोग्य विमा आणि पुरेशा रकमेचे संरक्षण पावसाळ्यातील आरोग्याच्या संकटांपासून आपले आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवण्यास मोलाची भूमिका बजावते.



## पोस्टातील बचत खात्याचे चेकबुक हवंय?

**टपाल खात्याच्या बचती खातेधारकांसाठी डिजिटल बँकिंग सेवा अधिक सुलभ आणि वेगवान करण्यात आल्या आहेत. या सुविधेअंतर्गत आता ग्राहकांना चेक बुक मिळवण्यासाठी प्रत्यक्ष पोस्ट ऑफिसमध्ये जाण्याची गरज उरलेली नाही, तर घरबसल्या ऑनलाइन माध्यमातून अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. टपाल खात्याच्या या आधुनिक प्रणालीमुळे सामान्य नागरिकांचा वेळ वाचत असून बँकिंग व्यवहार अधिक पारदर्शक बनले आहेत.**

ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठी खातेधारकाला इंडिया पोस्ट पेमेंट बँक किंवा संबंधित अधिकृत मोबाईल ॲप्लिकेशन आणि नेट बँकिंग सेवेचा वापर करावा लागतो. सेवांचा लाभ घेण्यासाठी सर्वप्रथम आपल्या खात्यात लॉग इन करून सेवा किंवा रिक्वेस्ट विभागामध्ये प्रवेश करावा लागतो. तिथे गेल्यानंतर चेक बुकसाठी अर्ज किंवा नवीन चेक बुक अशी नोंद दिसते, ज्यावर क्लिक करून आवश्यक ती माहिती भरावी लागते. अर्ज सादर केल्यानंतर काही दिवसांच्या आत छापील चेक बुक ग्राहकांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठवले जाते.

चेक बुकसाठी अर्ज करताना काही महत्त्वाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक असते. बचत खात्यामध्ये किमान शिल्लक रकमेचा नियम पाळावा लागतो, अन्यथा चेक बुक जारी करताना किंवा नंतर काही शुल्क आकारले जाऊ शकते. सामान्यतः बचत खात्यामध्ये वीस पानांचे चेक बुक विनामूल्य किंवा नाममात्र शुल्कात दिले जाते, परंतु त्यानंतर अतिरिक्त पानांसाठी ठराविक रक्कम कापावी लागते. ग्राहकांनी अर्ज करताना आपला पत्ता आणि संपर्क क्रमांक अचूक असल्याची खात्री करून घेणे गरजेचे असते, जेणेकरून चेक बुक मिळण्यात कोणतीही अडचण निर्माण होत नाही.

डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रसार होत असताना पोस्ट ऑफिसने आपल्या सेवांमध्ये केलेले हे परिवर्तन अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंत सर्व स्तरातील नागरिकांना आधुनिक बँकिंग सुविधांचा लाभ घेता यावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. आर्थिक उलाढाली जलद आणि सुरक्षित व्हाव्यात यासाठी टपाल खात्यातर्फे अशा अनेक नवीन सुविधा सातत्याने जोडल्या जात आहेत, ज्यामुळे खातेधारकांच्या विश्वासात आणखी वाढ होत आहे.




## भविष्य निर्वाह निधी की म्युच्युअल फंड?

आजच्या काळात गुंतवणुकीचे अनेक नवे पर्याय उपलब्ध झाल्यामुळे अनेकांसमोर एक मोठा प्रश्न उभा राहतो, तो म्हणजे आपल्या भविष्यानिधीचा म्हणजेच पीएफचा पैसा काढून तो शेअर बाजाराशी जोडलेल्या म्युच्युअल फंडमध्ये गुंतवावा की नाही. नुकतीच कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने (ईपीएफओ) यावर महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली असून, नोकरदारांना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. पीएफचा पैसा काढून तो म्युच्युअल फंडात वळवणे योग्य आहे का आणि वृद्धापकाळात आर्थिक सुरक्षिततेसाठी नेमके काय उत्तम ठरेल, याचा घेतलेला हा आढावा.


कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने सोशल मीडियाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना सक्त ताकीद दिली आहे की, आपल्या निवृत्तीसाठी साचवलेला निधी काढून तो म्युच्युअल फंडात हस्तांतरित करू नये. समजूतदार नागरिकांसाठी भविष्य निर्वाह निधी हाच सर्वात मोठा आधार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. बऱ्याचदा तरुण वर्ग किंवा गुंतवणूकदार अधिक परताव्याच्या आशेने सुरक्षित सरकारी योजनांमधील पैशाला बाजाराच्या हवाली करतात, जे दीर्घकाळात नुकसानकारक ठरू शकते. पीएफ आणि म्युच्युअल फंड या दोन्ही वित्तीय पर्यायांचे उद्देश पूर्णपणे वेगळे आहेत, हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

भविष्य निर्वाह निधी ही एक कायदेशीर सामाजिक सुरक्षा योजना आहे, ज्याचा मुख्य उद्देश कर्मचाऱ्याच्या निवृत्तीनंतरचे जीवन आर्थिकदृष्ट्या सुरक्षित आणि स्थिर करणे हा असतो. यामध्ये कोणत्याही प्रकारची बाजारातील जोखीम नसते आणि सरकारद्वारे निश्चित केलेला परतावा मिळतो, जो सध्या आठ पूर्णांक पंचवीस टक्के इतका आहे. याउलट, म्युच्युअल फंड हे एक स्वेच्छिक आणि बाजारपेठेच्या चढ-उतारांवर आधारित गुंतवणुकीचे साधन आहे, ज्याचा वापर मुख्यत्वे दीर्घ मुदतीत संपत्ती निर्माण करण्यासाठी केला जातो. म्युच्युअल फंडात उच्च परताव्याची शक्यता जशी असते, तशीच मुद्दल बुडण्याची किंवा बाजार कोसळल्यास नुकसान होण्याची जोखीमही असते.

भविष्य निर्वाह निधी हा केवळ बचतीचा मार्ग नाही, तर तो कर्मचाऱ्यांना तीन स्तरांवर सुरक्षा कवच देतो, जे कोणत्याही म्युच्युअल फंडात उपलब्ध होत नाही. यामध्ये पहिली महत्त्वाची बाब म्हणजे मालकाचे अंशदान असते. म्युच्युअल फंडात केवळ गुंतवणूकदार स्वतःचे पैसे गुंतवतो, तर भविष्य निर्वाह निधीमध्ये कर्मचारी आणि कंपनी असे दोघेही बारा-बारा टक्के योगदान देतात. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे पेन्शनचा लाभ आहे. निवृत्तीनंतर पात्र कर्मचाऱ्यांना कर्मचारी पेन्शन योजनेच्या अंतर्गत दरमहा ठराविक पेन्शन मिळते. तिसरी आणि अत्यंत महत्त्वाची सुविधा म्हणजे मोफत विमा आहे. कर्मचारी जमा लिंक विमा योजनेच्या अंतर्गत सभासदाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला सात लाखांपर्यंतचे जीवन विमा कवच पूर्णपणे विनामूल्य मिळते.

या दोन्ही वित्तीय पर्यायांचा विचार केला तर हे स्पष्ट होते की म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणे चुकीचे नाही, परंतु त्याला भविष्य निर्वाह निधीचा पर्याय मानणे अत्यंत चुकीचे ठरेल. भविष्य निर्वाह निधी हा आपल्या निवृत्तीच्या नियोजनाचा पाया असला पाहिजे, ज्यामुळे वृद्धापकाळात निश्चित उत्पन्न आणि कुटुंबाला संरक्षण मिळते. जर तुमच्याकडे नियमित बचतीनंतर अतिरिक्त पैसा उरला असेल आणि तुम्ही बाजाराची जोखीम पत्करायला तयार असाल, तर तुम्ही स्वतंत्रपणे म्युच्युअल फंडात एसआयपी सुरू करू शकता. परंतु, भविष्य निर्वाह निधीचा सुरक्षित आणि हक्काचा पैसा जोखिमयुक्त बाजारात ओतणे अजिबात शहाणपणाचे ठरत नाही. निवृत्तीच्या काळात खऱ्या अर्थाने पाठबळ देणारी योजना ही सुरक्षितता आणि निश्चिततेवर आधारलेलीच असली पाहिजे.

## विवरण भरताना चुका झाल्यास...



■ जाणून घ्या

प्राप्तिकर विवरणपत्र भरताना काही चुका राहिल्यास त्या सुधारण्यासाठी आयकर विभागाने करदात्यांसाठी एक अत्यंत उपयुक्त सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विवरणपत्र सादर केल्यानंतर जर त्यात कोणतीही त्रुटी किंवा चुकीची माहिती भरल्याचे लक्षात आले, तर पडताळणी करण्यापूर्वी ते रद्द करण्याची सोय या सुविधेमुळे मिळते. या पर्यायाला डिस्कार्ड असे म्हटले जाते, ज्याच्या माध्यमातून चुकलेले विवरणपत्र पूर्णपणे काढून टाकून नवीन व अचूक माहितीसह नव्याने विवरणपत्र दाखल करणे शक्य होते.

जुनी पद्धत पाहता, एकदा विवरणपत्र भरल्यानंतर त्यात सुधारणा करण्यासाठी आधी त्याची पडताळणी करणे बंधनकारक असायचे आणि त्यानंतरच सुधारित विवरणपत्र दाखल करता येत असे. परंतु या नवीन सुविधेमुळे करदात्यांचा मोठा वेळ वाचतो. ही सुविधा केवळ अशाच विवरणपत्रांसाठी लागू आहे, ज्यांची ई-पडताळणी किंवा कागदी पडताळणी अद्याप झालेली नाही. जर एखाद्या करदात्याने आपले विवरणपत्र आधीच ई-वेरिफाय केले असेल किंवा भौतिक प्रत बंगळुरू येथील केंद्रीय प्रक्रिया केंद्राकडे पाठवली असेल, तर ही सुविधा वापरता येत नाही.

या प्रक्रियेचा लाभ घेण्यासाठी करदात्याला आयकर विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपल्या खात्यात लॉग इन करावे लागते. त्यानंतर ई-फाइल या पर्यायावर क्लिक करून प्राप्तिकर विवरणपत्र आणि त्यानंतर ई-वेरिफाय विवरणपत्र या विभागात गेल्यास हा पर्याय उपलब्ध होतो. एकदा एखादे विवरणपत्र रद्द केल्यावर ते पुन्हा पूर्ववत करता येत नाही, त्यामुळे हा निर्णय अत्यंत काळजीपूर्वक घेणे आवश्यक ठरते. एकदा हे विवरणपत्र रद्द केले की ते प्रणालीतून पूर्णपणे काढून टाकले जाते आणि करदात्याने ते कधीच दाखल केले नव्हते असे मानले जाते.

मुदतीचा विचार केल्यास, ही सुविधा संबंधित मूल्यांकन वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या एकोणतीस तारखेपर्यंत किंवा कायद्यानुसार ठरवून दिलेल्या अंतिम मुदतीपर्यंत वापरता येते. मात्र यात एक महत्त्वाची तांत्रिक बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. समजा एखाद्या करदात्याने विवरणपत्र अंतिम मुदतीपूर्वी दाखल केले, परंतु पडताळणी न केल्यामुळे ते रद्द केले आणि नवीन विवरणपत्र मुदत संपल्यानंतर दाखल केले, तर नवीन विवरणपत्र उशिरा भरलेले मानले जाते. अशा स्थितीत विलंबाबद्दल आकारले जाणारे शुल्क किंवा इतर कायदेशीर तरतुदी लागू होऊ शकतात. ही सुविधा वापरताना करदात्यांनी योग्य ती दक्षता घेणे आणि सर्व माहितीची खात्री करूनच अंमलबजावणी करणे हिवाळ्याच्या किंवा कर भरण्याच्या हंगामात अत्यंत लाभदायक ठरते. योग्य वेळी घेतलेला हा निर्णय करदात्यांना अनावश्यक दंडात्मक कारवाईपासून दूर ठेवण्यास मदत करतो.

## नवीन करप्रणालीला पसंती का?




आयकर विवरणपत्र भरताना बहुतांश करदाते आता जुनी कर प्रणाली मागे टाकून नवीन कर प्रणालीची निवड करत आहेत. जुनी प्रणाली सोडावीशी वाटण्याची कारणे काय आहेत?

नवीन कर प्रणाली ही बहुतांश नागरिकांची पहिली पसंती बनली असली, तरी प्रत्येकासाठीच ती उत्तम पर्याय ठरेल असे नाही. विवरणपत्र दाखल करणाऱ्या बहुतांश नागरिकांचा कल नवीन कर प्रणालीकडे वाढला असून तज्ज्ञांच्या मते, करदात्यांनी नवीन प्रणालीचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला आहे. गेल्या काही वर्षांत या संख्येत सातत्याने वाढ झाली असून, यामागील नेमकी कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. नवीन कर प्रणालीमध्ये सरकारने कलम सत्याऐंशी अ अंतर्गत मिळणारी कर सवलत वाढवली आहे. कर टप्प्यांमध्येही आवश्यक बदल करण्यात आले असून प्रमाण वजावटीचा फायदाही वाढवण्यात आला आहे. याच कारणामुळे आधीच्या तुलनेत अनेक पगारदार कर्मचाऱ्यांचा कर भार कमी झाला आहे. कमी कर दर, अधिक कर सवलत आणि वाढलेली प्रमाण वजावटीची मर्यादा यामुळे नवीन कर प्रणाली अधिक आकर्षक ठरत आहे.

२. जुनी कर प्रणालीमध्ये घरभाडे भत्ता, कलम ऐंशी सी, कलम ऐंशी डी आणि इतर वजावटींसाठी विविध प्रकारचे दस्तऐवज जपून ठेवावे लागत असत. नवीन कर प्रणालीमध्ये याची गरज बऱ्याच अंशी कमी होते. त्यामुळे विवरणपत्र भरणे देखील अत्यंत सोपे झाले आहे. लोकांना आता केवळ कर वाचवण्यासाठी विनाकारण गुंतवणूक करावीशी वाटत नाही. सुलभ प्रक्रियेमुळे नागरिक वेगाने नवीन कर प्रणालीकडे वाटचाल करत आहेत.

३. ज्या व्यक्तींकडे वजावटीचे विविध पर्याय उपलब्ध नाहीत, त्यांच्यासाठी नवीन कर प्रणाली थेट कर बचतीची संधी देत आहे. याच कारणामुळे दरवर्षी ही प्रणाली निवडणाऱ्यांच्या संख्येत भरघोस वाढ होत आहे. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत चालू वर्षात बहुतांश ग्राहकांनी नवीन कर प्रणालीचा लाभ घेतल्याचे कर तज्ज्ञांचे निरीक्षण आहे.

४. नवीन कर प्रणालीमध्ये मोजकीच गणती करावी लागते आणि कागदपत्रांची गरजही खूप कमी भासते. यामुळे कर विवरणपत्र वेळेत आणि लवकर दाखल होते. ज्यांचे उत्पन्न ठराविक मर्यादेपर्यंत आहे, असे अनेक करदाते केवळ कागदपत्रे कमी लागतात आणि संपूर्ण प्रक्रिया सुटसुटीत आहे याच कारणास्तव नवीन कर प्रणालीची निवड करत आहेत.

५. नवीन कर प्रणाली बहुतांश लोकांची पहिली पसंती बनली असली, तरी प्रत्येक करदात्यासाठी ती उत्तम ठरेलच असे नाही. ज्या व्यक्तींना घरभाडे भत्ता, गृहकर्जावरील व्याज, वजावटीचे इतर लाभ किंवा अन्य मोठे कर फायदे मिळतात, त्यांच्यासाठी जुनी कर प्रणाली अद्यापही अधिक फायदेशीर ठरू शकते.

## एफआयआय कोणत्या समभागात पैसा गुंतवताहेत?




गेल्या काही महिन्यांत भारतीय शेअर बाजारात विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी एका बाजूला मोठी विक्री केली असली, तरी काही निवडक कंपन्यांमध्ये त्यांनी सलग चार तिमाहींमध्ये आपली हिस्सेदारी सातत्याने वाढवली आहे. जून २०२६ तिमाहीच्या शेअरहोल्डिंग पॅटर्ननुसार, विदेशी गुंतवणूकदारांनी एकूण बाजारातून पैसे काढले असले तरी अनेक स्मॉल-कॅप आणि मिड-कॅप समभागांमध्ये त्यांनी गुंतवणूक केली आहे.

विदेशी गुंतवणूकदारांचा एकूण ओघ कमी असण्यामागे महागाई, कच्चे तेल, वाढते मूल्यांकन आणि भू-राजकीय तणाव ही कारणे आहेत. मात्र, असे असूनही अनेक कंपन्यांवर त्यांचा विश्वास कायम राहिला आहे. सर्वाधिक हिस्सेदारी वाढलेल्या कंपन्यांमध्ये एमटीएआर टेक्नॉलॉजीज, नॉलेज मरीन अँड इंजीनियरिंग वर्क्स, वर्चुओसो ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स, साउथ इंडियन बँक, पॉलीकॅब इंडिया आणि यूपीएल यांचा प्रामुख्याने समावेश आहे. तज्ज्ञांच्या मते, विदेशी गुंतवणूकदारांनी मुख्यत्वे लार्ज-कॅप स्टॉक्समधून पैसे काढून ते कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इतर आशादायक क्षेत्रांकडे वळवले आहेत. तसेच, अनेक मध्यम आणि लहान कंपन्या आकर्षक मूल्यावर उपलब्ध असल्यामुळे तिथे त्यांनी मोठी खरेदी चालू ठेवलेली दिसते. निफ्टी१०० मधील कंपन्यांमध्ये संमिश्र चित्र पाहायला मिळाले, जिथे विदेशी गुंतवणूकदारांच्या बिकवालीचा जोर अधिक होता, परंतु देशांतर्गत संस्थागत गुंतवणूकदारांनी बाजाराला मोठा आधार दिला आहे. टाटा टेक्नॉलॉजीज कंपनीमध्ये विदेशी गुंतवणूकदारांची हिस्सेदारी जून २०२५ मधील ४.९ टक्क्यांवरून सतत वाढत जाऊन जून २०२६ मध्ये ६.३ टक्क्यांवर पोहोचली असून, यामध्ये १.४ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे, मात्र या शेअरचा एक वर्षाचा परतावा उणे ५.८ टक्के राहिला आहे.

वेदांता कंपनीत हिस्सेदारी १०.६ टक्क्यांवरून वाढून १५.८ टक्के झाली असून, यात ५.२ टक्क्यांची मजबूत वाढ झाली आहे आणि या शेअरने ६२.५ टक्के इतका चांगला परतावा दिला आहे. हिंदाल्को इंडस्ट्रीजमध्ये विदेशी गुंतवणूकदारांची हिस्सेदारी २७.६ टक्क्यांवरून वाढून ३१.४ टक्के झाली असून, ३.८ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे आणि या शेअरचा एक वर्षाचा परतावा २३.० टक्के राहिला आहे.

पॉलिकॅब इंडियामध्ये हिस्सेदारी ११.५ टक्क्यांवरून वाढून १९.० टक्के झाली असून, ७.६ टक्क्यांची मोठी वाढ आणि ४८.६ टक्के परतावा नोंदवला गेला आहे.

यूपीएल कंपनीत हिस्सेदारी ३४.९ टक्क्यांवरून वाढून ४२.४ टक्के झाली असून, यामध्ये ७.५ टक्क्यांची वाढ झाली आहे आणि याचा एक वर्षाचा परतावा उणे १.६ टक्के राहिला आहे. तसेच, एल अँड टी फायनान्समध्ये हिस्सेदारी ६.२ टक्क्यांवरून वाढून ७.७ टक्के झाली असून, १.५ टक्क्यांची वाढ आणि ७९.० टक्के इतका मजबूत परतावा मिळाला आहे.

## दहा वर्षांआधी नोकरी सोडल्यास पेन्शन खात्यातील जमा रकमेचे काय होते?




कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या अंतर्गत येणाऱ्या कर्मचारी पेन्शन योजनेबाबत नोकरदार वर्गामध्ये नेहमीच मोठी उत्सुकता आणि काळजी असते. जर एखाद्या कर्मचाऱ्याने दहा वर्षे पूर्ण करण्याआधीच आपली नोकरी सोडली, तर त्याच्या पेन्शन खात्यातील जमा रकमेचे काय होते, हा प्रश्न अनेक जण विचारतात. या नियमांनुसार नोकरी सोडणाऱ्या व्यक्तीला पेन्शनचा लाभ मिळतो की नाही आणि त्याचे पैसे कसे सुरक्षित राहतात, याची सविस्तर माहिती प्रत्येक कर्मचाऱ्याने जाणून घेणे गरजेचे ठरते.

नियमांनुसार जर एखाद्या व्यक्तीने सलग किंवा खंडित मिळून दहा वर्षे सेवा पूर्ण केलेली नसेल, तर ती व्यक्ती निवृत्तीवेतनासाठी पात्र ठरत नाही. अशा स्थितीत कर्मचाऱ्याकडे दोन पर्याय उपलब्ध असतात. पहिला पर्याय म्हणजे पेन्शन योजनेतून आपली जमा रक्कम पूर्णपणे काढून घेणे आणि दुसरा पर्याय म्हणजे योजना प्रमाणपत्र प्राप्त करणे. जर कर्मचाऱ्याने नोकरी सोडल्यानंतर नवीन नोकरी स्वीकारली, तर तो आपले जुने खाते नव्या कंपनीशी जोडू शकतो, ज्यामुळे मागील सेवाकाल पुढील सेवेत जोडला जातो आणि दहा वर्षांचा कालावधी पूर्ण करणे शक्य होते.

जर एखाद्या व्यक्तीने नवीन नोकरी न करण्याचे ठरवले आणि पेन्शनचे पैसे काढून घेण्याचा निर्णय घेतला, तर त्यासाठी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाच्या पोर्टलवर जाऊन अर्ज करावा लागतो. या प्रक्रियेमध्ये कर्मचाऱ्याने जमा केलेल्या रकमेची गणना विशिष्ट सूत्रानुसार केली जाते, ज्यामध्ये सेवेचे वर्ष आणि त्यावेळचा पगार यांचा विचार केला जातो. मात्र, जर सेवेचा काळ सहा महिन्यांपेक्षा कमी असेल, तर पेन्शन फंडात जमा झालेली रक्कम काढता येत नाही, कारण ती केवळ भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा राहते.

दुसरीकडे, योजना प्रमाणपत्र घेणे हा एक अत्यंत सुरक्षित पर्याय मानला जातो. या प्रमाणपत्राच्या माध्यमातून जुनी सेवा कायम राहते आणि भविष्यात पुन्हा नोकरीला लागल्यास तीच सेवा पुढे जोडली जाते. यामुळे पेन्शनच्या पात्रतेसाठी आवश्यक असणारे दहा वर्षांचे बंधन पूर्ण करणे सोपे होते. अनेक आर्थिक जाणकार कर्मचाऱ्यांना पैसे काढून घेण्याऐवजी सेवा प्रमाणपत्र घेण्याचा किंवा नवीन कंपनीमध्ये खाते हस्तांतरित करण्याचा सल्ला देतात, जेणेकरून भविष्यातील आर्थिक सुरक्षा अबाधित राहू शकते.

# संवादफेक, अभिनय अन् टाळ्यांचा कडकडाट, राज्यस्तरीय नाट्यछटा स्पर्धा उत्साहात संपन्न



बालरंगभूमीवरील विजेत्यांसमवेत प्रमुख पाहुणे, परीक्षक व इतर मान्यवर.

नगर – येथील बालरंगभूमी परिषद शाखेतर्फे मानसी भणगे स्मृती राज्यस्तरीय नाट्यछटा महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा २ ऑगस्ट रोजी पेमराज सारडा महाविद्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात पार पडला.

बालरंगभूमी परिषदेच्या वतीने मराठी बालनाट्य दिवस साजरा करताना सिने, नाट्य अभिनेते हरीष बारस्कर व राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक अभिजित दळवी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अभिजित दळवी म्हणाले, बालरंगभूमी परिषदेमुळे नगर जिल्ह्यातील बालकलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे. सातत्याने विविध कार्यक्रमातून जिल्ह्यातील बाल कलाकारांची संख्या वाढली असून त्यांचे पालक आणि संबंधित शाळा स्वयं:स्फूर्तीने अश्या स्पर्धांना प्रतिसाद देत आहेत ही गोष्ट आनंददायी आहे. आजच्या डिजिटल युगातही मुलांचा नाटकाकडे असलेला ओढा कौतुकास्पद आहे. यात विशेषतः राहुरी, संगमनेर, कोपरगाववरून स्पर्धेसाठी आलेल्या सर्व स्पर्धकांचे विशेष कौतुक हरीष बारस्कर यांनी केले. तीन गटात पार पडलेल्या या आंतरशालेय स्पर्धेस या वर्षी वैशाली गोस्वामी, अभय गोले, अश्विनी अंचवले व अविनाश कराळे परीक्षक म्हणून उपस्थित होते.

२१९ स्पर्धकांनी सामाजिक, ऐतिहासिक, कौटुंबिक आणि विनोदी विषयांवर आधारित नाट्यछटा सादर करून उपस्थितांची मने जिंकत गट निहाय बक्षिसांची लयलूट केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद भणगे यांनी स्पर्धकांचा आत्म विश्वास, अचूक संवादफेक आणि रंगमंचावरील सहज वावर या स्पर्धेच्या जमेच्या बाजू असून बालरंगभूमी परिषदेच्या येत्या वर्षभरातील कार्यक्रमांची रूपरेषा सांगितली. नाट्यछटा महोत्सवाचे हे सातवे वर्ष असून नगर जिल्ह्यासह पुणे, शिरूर, बीड शहरातून स्पर्धेसाठी बाल कलाकार दरवर्षी उत्साहाने येतात. आपली कला सादर करीत बक्षिसे मिळवतात. त्यामुळे स्पर्धेचे दर वर्षी आयोजन करण्यात येईल, असे आश्वासन मध्यवर्तीचे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके यांनी दिले. यावेळी कल्पनेची फुले या प्राची भदे लिखित नाट्यछटा पुस्तकाचे प्रकाशन ही करण्यात आले.

बालरंगभूमी परिषद अहिल्यानगर शाखेतर्फे यावर्षी पासून बालनाट्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यास सुरुवात झाली यावर्षी राहुरी येथील भगिरथीबाई तनपुरे शाळेच्या प्रशांत सूर्यवंशी सर आणि भिंगार छावणी परिषद शाळेच्या स्नेहल लवांडे यांना सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेसाठी सोनाली दरेकर, सपना साळुंके, तेजा पाठक, ऋतुजा पाठक, अनंत जोशी, शैलेश देशमुख, विराज अडगटला, तेजस अतितकर आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीया देशमुख यांनी केले. आभार देवीप्रसाद सोहिनी यांनी मानले.

स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे : ८ वी ते १० वी गट :– सर्वोत्कृष्ट: तनुष वाझा, साईराज सरडे, इशिता उगले, उत्कृष्ट: राजेश्वरी जाधव, आर्य खराडे, शिवराज होंडारे, उत्तेजनार्थ : वेदिका लोंढे, संदेश ढोकणे, शार्वी कराळे, राही धुमाळ, अनुजा शिंदे, ४थी ते ७वी गट : – सर्वोत्कृष्ट: श्रीयांश घोडके, सायली गिरी, ओजस्वी पाठक, उत्कृष्ट : मनस्वी भणभणे, प्रभास पाठक, ओवी देव, उत्तेजनार्थ : श्रावणी कोहोकडे, स्वरा गाडेकर, श्रेया कोकाटे, मनस्वी सोहोनी, नीलम साठे, १ ली ते ३ री गट : – सर्वोत्कृष्ट: शिवण्या राऊत, आराध्या वाघमोडे, विदिशा राऊत, उत्कृष्ट: सान्वी कराळे, पूर्व उगले, प्रज्ञा जोशी, उत्तेजनार्थ: ध्वज मुनोत, सार्थक अरगडे, नायरा कटारिया, नीलांबरी भिंगारदिवे, अरिणी खानवेलकर.

## गुरुवाणी – ७
### चांगल्या गोष्टी आत्मसात करा



जो आता है वो 'पर्सन' है. जिसको लाया जाता है वो 'पार्सल' है. गुरूदेव समजुन घ्यायचे तर 'पर्सन' बना. समजदार व्यक्ती प्रत्येक गोष्ट समजून घेतो. असमजदार प्रत्येक गोष्ट उलट अर्थाने घेतो. आचार्य असावे तर गुरूदेव आचार्यश्रींसारखे. आयुष्यात शिखरावर जायला हेलिकॉप्टर, लिफ्ट नाही भेटत. तिथे आपल्या पायांनीच जावे लागते. असे दमदार पावले ज्यांची असतात तेच आचार्य भगवंत बनतात. 'आनंदगाथा' कहाणी नाही तर 'सत्य' आहे. गुरूदेवांना कधीच नाही वाटले की, देव, धर्म वेगळे वेगळे असतात. त्यांनी सर्वच धर्म ग्रंथांचा अभ्यास केला. त्यातून चांगल्या गोष्टी आत्मसात केल्या. ते कायम सर्वांसाठी वंदनीय होते. पण जेव्हा ते कोणाकडून शिकायचे तेव्हा ते विद्यार्थी बनून जमिनीवर बसायचे आणि शिकायचे. शिकायचे असेल तर विनयशीलता असावी हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. स्वतः गुरूदेव असताना त्यांच्यातील 'विद्यार्थी' कायम जिवंत होता. आज शिकायच्या वयातही कोणी विद्यार्थी बनायला तयार नाही. आजच्या काळात ज्याच्याकडून शिकतो त्यालाही आदर दिला जात नाही. गुरूदेवांनी 'आगम' फक्त वाचले नाहीत तर ते आगम जगले. ज्याच्यात पॉझिटिव्ह एनर्जी घ्यायचे कौशल्य असते त्याला 'शिष्य' म्हणतात. दगडाला पाणी मिळते पण दगड पाणी पिऊ नाही शकत. माती पाणी ग्रहण करू शकते. मातीचा हा आश्रव करण्याचा गुण आपल्यात असायला हवा. घरात सासू सुन बनून सुनेसोबत राहिली पाहिजे. तसेच बापानेही आपल्यातील मुलगा जिवंत ठेवला पाहिजे. 'मी वयाने मोठा झालो तरी हृदयाने लहान मुलासारखाच राहील' हे आनंदगाथेचे सूत्र लक्षात ठेवावे. आचार्यश्री शेवटपर्यंत नवीन गोष्टी शिकतच राहिले. आचार्यपदावर असताना ते शिकण्यासाठी वेळ काढायचे. ही गोष्ट आपण आत्मसात केली पाहिजे. ज्याच्यातून सुवास जन्मतो त्याला सहवास म्हणतात. ज्याच्यामधून अविश्वास जन्मतो त्याला दुस्वास म्हणतात. आनंदगाथेचे हेच सूत्र आहे की, चांगल्या गोष्टी आत्मसात करा. अहंकारी कायम दुसऱ्याचा अनादर करतो. अभिमानी दुसऱ्याचा कायम आदर करतो. आज प्रत्येकाने संकल्प करावा की, 'घरातील कोणाचाही मी अपमान करणार नाही'. ही एक गोष्ट आचरणात आणली तर घर कधीही दुभंगणार नाही.

**–उपाध्याय प्रवर पू.श्री.प्रविणऋषिजी म.सा.**

## गुरुवाणी – ८
### मुलांना समर्थ बनवा



आपल्या अंतः करणात गुरूदेवांच्या ऊर्जेचा 'आश्रव' झाला पाहिजे. मनुष्य जीवन दिसायला स्वावलंबी आहे पण प्रत्यक्षात परावलंबी आहे. आई वडील बोट पकडून चालायला शिकवतात. गायीचे वासरू जन्मानंतर लगेच उठून उभं राहत. मनुष्य आणि इतर प्राण्यांमध्ये हा फरक आहे. जैन आगमनुसार आत्मा ज्यावेळी आईच्या गर्भात आत्मा प्रवेश करतो, तेव्हापासून त्याचे आश्रव करणे सुरू होते. तो आईच्या ऊर्जे चे, तिने ग्रहण केलेल्या अन्नाचा आश्रव करतो. गर्भात जीव येताच आईला सर्वप्रथम कळते, तिच्यात बदल होतात. आई प्रथम स्वप्न जागर करते. जीव शुभ संकेत घेऊन आला असेल तर चांगले स्वप्न पाहते. अशुभ स्वप्न ती धुवून टाकते. 'अर्हम गर्भसंस्कार' हेच शिकवते. अशा गर्भसंस्काराला सुरूवातीला खूप विरोध झाला. पण आज सर्वच जैन संप्रदायात याचे अनुकरण होत आहे. आपल्याला पहिला पाठ आई वडील शिकवतात. यासाठीच गर्भसंस्कारात सुरूवातीला आईवडिलांवर संस्कार केले जातात. आजच्या काळात मुलांना तीन वर्षांचे झाले की नर्सरी स्कूलमध्ये पाठवले जाते. खरं तर ही वेळ आईवडिलांनी संस्कार करण्याची असते. आश्रवचे तीन प्रकार आहेत. पहिला आश्रव जीव स्वतः करतो, दुसरा आश्रव कोणीतरी प्रेमाने करवतो आणि तिसरा म्हणजे अनुशासनाचे इंजेक्शन देऊन दिला जाणारा आश्रव. आपल्या संततीला आपण सुखी करण्यासाठी धडपड करतो. पण त्याला 'समर्थ' बनवत नाही. जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराज यांना समर्थ बनवले. कारण समर्थ कधी दुःखी होत नाही आणि सुखी कधी कायम सुखी राहत नाही. मुलांना समर्थ बनवले तरच पुढची पिढी सामर्थ्यवान होईल. लहान मुलांना मोबाईल देणारे पालक त्याचे शत्रू आहेत. मेडिकल सायन्स ओरडून ओरडून मोबाईलचे दुष्परिणाम सांगत आहे. महाभारतात दुर्योधनाचे सगळे हट्ट धृतराष्ट्र आणि गांधारीने पूर्ण केले. कुंतीने पांडवांची एकही इच्छा पूर्ण केला नाही. तिने एकच सवय लावली, 'मी जे सांगेल ते तुम्हाला करावे लागेल'. तुम्ही तुमच्या संततीला पांडव बनवताय की कौरव ? याचा विचार करा. हुलसा माता यांनी गुरूदेवांना लहान वयातच तीर्थंकरांच्या वाटेवर चालायला शिकवले. यासाठी प्रचंड आग्रह धरला. याच काळात चिचोंडीत पूज्य वंदनीय रत्नऋषीजी महाराजांचे आगमन झाले. आणि माता हुलसा यांना कळले की आता आपली इच्छा पूर्ण होणार. त्या गुरूदेवांना त्यांच्याकडे प्रतिक्रमण शिकायला घेऊन गेल्या. पुढे इतिहास घडला. आईचे बोट धरून चालाल तर 'मंजिल' नक्कीच मिळते. आताच्या सर्व आईंनी माता हुलसा यांचा आदर्श समोर ठेवावा. मुलांच्या संगोपनात अनुशासन महत्वाचे आहे.

**–उपाध्याय प्रवर पू.श्री.प्रविणऋषिजी म.सा.**

# शहरात ५ ऑगस्ट रोजी रंगणार 'प्यार दिवाना होता हैं' गीतमैफल



स्व.किशोर कुमार अजय दगडे डॉ.अभिजीत पाठक

नगर – सदाबहार गायक किशोर कुमार यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त किशोरकुमार फॅन क्लब, अहिल्यानगर यांच्या वतीने पोलाद स्टील व विंटेज हिल्स यांच्या सहकार्याने ५ ऑगस्ट रोजी प्यार दिवाना होता है या विशेष गीतमैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सावेडी येथील माऊली सभागृहात सायंकाळी ६.३० ते रात्री ९ या वेळेत होणार असून संगीतप्रेमींसाठी हा कार्यक्रम सुरेल पर्वणी ठरणार आहे, अशी माहिती किशोरकुमार फॅन क्लबचे अमोल खोले यांनी दिली.

कार्यक्रमाच्या उद्घानप्रसंगी आमदार संग्रामभैय्या जगताप, शिल्पकार प्रमोद कांबळे, पोलाद स्टीलचे अध्यक्ष जयेश मेहता, विंटेज हिल्सचे संजोग मुथा, संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे सुमितदादा कोल्हे, डॉ. बापूसाहेब कांडेकर, माजी नगरसेवक अविनाश घुले, एड चे अध्यक्ष अभिजित देवी, आशिष भाबडा, आर्किटेक्ट प्रल्हाद जोशी, दिनेश गोपलानी, कुणाल डुंगरवाल, डॉ. हर्षवर्धन तनवर, डॉ. मुग्धा तनवर, हेमंत कराळे, डॉ. सुलभा पवार, डॉ. स्मिता पटारे, डॉ. दमण काशीद, राकेश गांधी, सचिन भुतारे, मनोज चोपडा, सुरज नन्नवरे, चेतन भंडारी, किरण गवते, भूषण ओस्तवाल, अभिषेक शेलार आदी उपस्थित राहणार आहेत.

गेल्या १९ वर्षांपासून किशोरकुमार फॅन क्लबच्या माध्यमातून रसिकांसाठी किशोरकुमार यांच्या अजरामर गीतांची मैफल आयोजित केली जात आहे. यंदाच्या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक अजय दगडे आणि पुण्यातील सुप्रसिद्ध गायिका राधिका अत्रे किशोरकुमार यांची लोकप्रिय गीते सादर करणार आहेत. या गीतमैफिलीत अहिल्यानगर, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित वादक कलाकार दिलावर शेख, अमन सय्यद, अजित गुंदेचा, ललित भूमकर, अजय साळवे, महेश गुरव, हार्दिक रावल, संजय आठवले, अमित साळवे, श्रीकांत गडकरी आणि रोहित कटारे हे सहभागी होणार आहेत. कार्यक्रमादरम्यान दरवर्षीप्रमाणे सुप्रसिद्ध शिल्पकार प्रमोद कांबळे हे किशोरकुमार यांचे लाईव्ह चित्र रेखाटन सादर करणार आहेत. कार्यक्रमासाठी शांती ऑडिओ यांच्याकडून ध्वनी व प्रकाशयोजना करण्यात येणार असून प्रसाद बेडेकर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन करणार आहेत.

यावर्षी किशोर कुमार सन्मित्र पुरस्कार अहिल्यानगरचे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजीत पाठक यांना प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती गायक अजय दगडे यांनी दिली. कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून बैठक व्यवस्थेत प्रथम येणाऱ्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. आयोजकांनी संगीतप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल मैफिलीचा आनंद घ्यावा, असे आवाहन केले आहे. मोफत प्रवेशिका व अधिक माहितीसाठी ८१४९८१५८१५, ८८०५०५८८९९ आणि ९२७१७१२३९३ यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मेगा महाराष्ट्र ब्रायडल स्पर्धेत नगरच्या पल्लवी आगरवाल यांना द्वितीय क्रमांक



मेगा महाराष्ट्र ब्रायडल कॉम्पिटिशनमध्ये सहभागी मॉडेल ऋतुजा हराळ यांच्यासह पल्लवी आगरवाल.

नगर – नाशिक येथे नुकत्याच उत्साहात पार पडलेल्या मेगा महाराष्ट्र ब्रायडल कॉम्पिटिशन – लूक अँड लर्न सेमिनारमध्ये अहिल्यानगरच्या पल्लवी सचिन आगरवाल यांनी उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या स्पर्धेत ऋतुजा हराळ या मॉडलने पल्लवी आगरवाल यांना मोलाची साथ दिली. आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्ट सुनीता दोंड यांच्या आयोजनाखाली झालेल्या या स्पर्धेत नाशिकसह महाराष्ट्रातील विविध भागातील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. कमी वेळेत उत्कृष्ट कौशल्य, सर्जनशीलता आणि अचूकता दाखवत पल्लवी आगरवाल यांनी परीक्षकांची मने जिंकली आणि द्वितीय क्रमांक मिळवला. पल्लवी आगरवाल यांच्या या यशाबद्दल अहिल्यानगरच्या सौंदर्य क्षेत्रातून तसेच विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# शनी मारुती मंदिराच्या सुशोभीकरणासाठी उमेश प्रसाद यांच्याकडून दीड लाखांची देणगी



शनी मारुती मंदिराच्या सुशोभीकरण व विकासकामांना गती देण्यासाठी उद्योजक उमेश प्रसाद यांनी १ लाख ५१ हजारांचा धनादेश देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांच्याकडे सुपूर्द केला.

नगर – माळीवाडा पंचमंडळ देवस्थान ट्रस्टच्या शनी मारुती मंदिराच्या सुशोभीकरण व विकासकामांना गती देण्यासाठी उद्योजक उमेश अरुणकुमार प्रसाद यांनी १ लाख ५१ हजारांचा धनादेश देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांच्याकडे सुपूर्द केला. मंदिराच्या परिसराचे सुशोभीकरण, भाविकांसाठी अधिक सुविधा आणि धार्मिक वातावरण अधिक आकर्षक करण्याच्या उद्देशाने ही देणगी देण्यात आली.

यावेळी देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, ज्येष्ठ विश्वस्त पांडुरंग ननवरे, रंगनाथ फुलसौंदर, चंद्रकांत फुलारी, प्रा. माणिकराव विधाते, गणेश राऊत, मंदिराचे पुजारी अनंत पांडे, सचिन आगरकर यांच्यासह पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी उद्योजक उमेश प्रसाद यांच्या सामाजिक व धार्मिक बांधिलकीचे कौतुक करत त्यांच्या या योगदानामुळे मंदिराच्या विकासकामांना निश्चितच मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर म्हणाले, शनी मारुती मंदिर हे शहरातील श्रद्धास्थान असून येथे दररोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. मंदिराचे सुशोभीकरण, परिसराची स्वच्छता, आवश्यक सुविधा आणि भाविकांना अधिक चांगल्या वातावरणात दर्शन घेता यावे यासाठी देवस्थान ट्रस्ट सातत्याने प्रयत्नशील आहे. ही कामे केवळ ट्रस्टच्या माध्यमातून नव्हे, तर भाविकांच्या सक्रिय सहभागातूनच अधिक प्रभावीपणे पूर्ण होऊ शकतात. उद्योजक उमेश प्रसाद यांनी कोणत्याही अपेक्षेशिवाय दिलेली ही देणगी प्रेरणादायी आहे. धार्मिक स्थळांचा विकास हा आपल्या संस्कृतीच्या जतनाशी निगडित विषय आहे. दानशूर व्यक्तींनी अशाच प्रकारे पुढे येऊन मंदिर विकासात योगदान दिल्यास भाविकांसाठी अधिक सुविधा उपलब्ध होतील आणि हे मंदिर आणखी भव्य व आदर्श स्वरूपात विकसित होईल, असे ते म्हणाले.

उद्योजक उमेश प्रसाद म्हणाले, शनी मारुती मंदिराविषयी माझ्या मनात विशेष श्रद्धा आहे. मंदिराचे सुशोभीकरण आणि विकास ही काळाची गरज असून या पवित्र कार्यात सहभागी होण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य समजतो. भविष्यातही धार्मिक उपक्रमांसाठी शक्य ते सहकार्य करण्याचा माझा प्रयत्न राहील.

देवस्थान ट्रस्टच्या वतीने उद्योजक उमेश प्रसाद यांचा सत्कार करण्यात आला.

# अहिल्यानगर मनपा आरोग्य विभागातील डॉ. आयेशा शेख, पाणी तपासणी कर्मचारी शेलार यांचा निवृत्तीनिमित्त सत्कार



महापालिकेच्या आरोग्य विभागातील डॉ. आयेशा शेख आणि पाणी तपासणी कर्मचारी रमेश शेलार यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

नगर – महानगरपालिका आरोग्य विभागातील डॉ. आयेशा शेख व पाणी तपासणी कर्मचारी रमेशशेलारयांच्यासेवानिवृत्तीनिमित्त मनपा आरोग्य विभागाच्या वतीने त्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी त्यांच्या प्रदीर्घ, प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ सेवेला मानाचा मुजरा करण्यात आला.

मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर म्हणाले, समाजामध्ये कोणत्याही क्षेत्रात काम करत असताना प्रामाणिकपणा, शिस्त आणि वेळेचे भान ठेवून केलेली सेवा समाजासाठी मोलाची ठरते. डॉ. आयेशा शेख यांनी गेल्या ३४ वर्षांपासून महापालिकेच्या आरोग्य विभागात अत्यंत निष्ठेने रुग्णसेवा करत आपल्या कर्तव्याचे उत्कृष्ट पालन केले. त्यांनी ज्या–ज्या आरोग्य केंद्रांमध्ये सेवा बजावली, तेथे ओपीडीतील रुग्णसंख्या वाढली. त्यांच्या कार्यशैलीमुळे नागरिकांचा आरोग्य यंत्रणेवर विश्वास अधिक दृढ झाला. सेवानिवृत्तीपर्यंत त्यांच्या सेवाकाळावर कोणताही ठपका किंवा कलंक लागला नाही, ही आजच्या डिजिटल आणि पारदर्शक युगातील अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन नागरिकांना अधिक चांगली आरोग्य सेवा द्यावी.

डॉ. राजुरकर यांनी रमेश शेलार यांच्या कार्याचाही गौरव करत सांगितले की, शहरातील पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी अनेक वर्षे जबाबदारीने पार पाडले. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यामध्ये त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे.

सविता खिलारी म्हणाल्या, डॉ. आयेशा शेख यांनी स्वतःहून पुढाकार घेत शासनाच्या विविध आरोग्य योजना प्रभावीपणे राबवल्या. रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांनी आरोग्य विभागाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. त्यांचे कार्य इतर कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे. तसेच रमेश शेलार यांनीही आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडून विभागाच्या कार्यात मोलाचे योगदान दिले.

या सत्कार समारंभास आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दिलीप बागल, डॉ. वृषाली आरू, डॉ. नलिनी थोरात, योगेश औटी यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी दोन्ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या निरोगी, आनंदी आणि सुखमय निवृत्त जीवनासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.



एमआयडीसीतील सह्याद्री चौकात अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

# एमआयडीसीतील सह्याद्री चौकात अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

नगर – साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त सह्याद्री चौक, एमआयडीसी येथे सत्यशोधक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाउंडेशन आणि कामगार संघटना, एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. अबीर–गुलालाची उधळण, राष्ट्रभक्तीपर घोषणांचा जयघोष आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे एपीआय थोरात यांनी लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर महाप्रसाद वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन उद्योजक बाळासाहेब मोरे यांनी केले. महाप्रसादाची व्यवस्था अनिलशेठ नागरगोजे यांनी केली असून सुनीलशेठ मुनोत यांचे विशेष सहकार्य लाभले.

यावेळी महापालिकेचे नगरसेवक बाबासाहेब नागरगोजे, केशवशेठ नागरगोजे, मेजर निळकंठ उल्हारे, अनिलशेठ भिंगारे, सरपंच बबन डोंगरे, ग्रामपंचायत सदस्य बंडूनाना सप्रे, संजय भोर, नाथाभाऊ आल्हाट, जयश्री गायकवाड, ज्योती साठे, कल्याणी गोरखे, रमेश भिंगारदिवे, पोपट वैरागर, बाबू भाकरे तसेच कामगार संघटनेचे पदाधिकारी, प्रतिनिधी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# तपोवन रोडवर ऑफिसमधून दोन लॅपटॉप आणि शेगडीची चोरी; गुन्हा दाखल

नगर –उपनगरातील तपोवन रोड परिसरातील एका ऑफिसमधून चोरट्याने दोन लॅपटॉप आणि एक इलेक्ट्रिक शेगडी असा मुद्देमाल लांबवला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जेऊर (ता. नगर) येथील रहिवासी आणि कंत्राटदार बाळासाहेब कान्हु सुंबे यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे तपोवन मंदिराच्या मागे ऑफिस आहे. २९ जुलै रोजी सायंकाळी ७ ते ३० जुलै रोजी सकाळी १०:३० च्या दरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या ऑफिसमध्ये बेकायदेशीर प्रवेश केला. चोरट्याने आतून एचपी कंपनीचा जुना वापरता लॅपटॉप आणि डेल कंपनीचा लॅपटॉप, तसेच एक काळ्या रंगाची इलेक्ट्रिक शेगडी असा ऐवज लंपास केला. सकाळी ऑफिस उघडल्यानंतर चोरीचा हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी बाळासाहेब सुंबे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

